गणपति बाप्पा मोरया
मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज
# महासागर

» मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५
» पालघर कार्यालय
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मीबाई, विरार रेल्वे सबवे समोर, विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.
» नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८
» वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

पालघर - ठाणे- रायगड - रत्नागिरी
RNI No.: MAHAMAR/2014/62313 » शुक्रवार, ५ सप्टेंबर २०२५ » वर्ष: ११ » अंक: २८३ » पाने-८ » किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## बीडच्या माजी जिल्हा परिषद सदस्यावर बलात्काराचा गुन्हा

**बीड, दि. ४ प्रतिनिधी**

जिल्ह्यातील गुन्हेगारीच्या घटना काही कमी होताना दिसून येत नाहीत, गेल्या वर्षभरापासून बीड जिल्हा गुन्हेगारी वृत्तांमुळे केंद्रस्थानी असून राजकीय हस्तक्षेप सातत्याने दिसून येतो. दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणात आमदार धनंजय मुंडेंचे निकटवर्ती असलेल्या वाल्मिक कराडसह गँगला पोलिसांनी अटक केली आहे. मात्र, अद्यापह येथील गुन्हेगारी कमी होताना पाहायला मिळत आहे. आता, बीडच्या माजी जिल्हा परिषद सदस्यावर शिवाजीनगर पोलीस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका शिक्षकेने दिलेल्या तक्रारीवरून हा बलात्काराचा गुन्हा दाखल झाला असून नारायण शिंदे असं माजी जिल्हा परिषद सदस्याचे नाव आहे. शिंदे हे बीडमध्ये दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसमधील सक्रिय कार्यकर्ता आहे.

अग्राग्रलेख

### खरीखरी

## सामान्य जनोपयोगी

कालच केंद्रीय अर्थमंत्री, राज्यांचे मुख्यमंत्री त्यांची जीएसटी बाबत बैठक पार पडली. या बैठकीत सध्या जीएसटीचे दर जे चार टप्प्यांमध्ये आहेत त्यांना दोन टप्प्यात आणण्याचा निर्णय पक्का झाला. यामुळे अनेक मध्यमवर्गियांना दिलासा मिळणार आहे. आजच्या या निर्णयामुळे पाच टक्के, बारा टक्के, १८ टक्के आणि २८ टक्के अशा चार स्लॅबमध्ये असलेली जीएसटी आता फक्त पाच आणि १८% झालेली आहे. हे दोनच स्लॅब आता शिल्लक उरलेले आहेत. यामुळे मध्यमवर्गीयांच्या खर्चात निश्चितच बचत होणार आहे. चार स्लॅब ठेवले म्हणून अनेक दिवसांपासून काँग्रेस पक्षाचा या विरोधात प्रचार सुरू होता. आता येत्या नवरात्र उत्सवाच्यापूर्वी सामान्य आणि मध्यमवर्गीय जनतेला दिलासा मिळेल १२% आणि २८% हे दोन स्लॅब रद्द केल्यामुळे १२% तील बहुतेक वस्तू पाच टक्क्यांवर येतील. जीएसटी परिषदेने अनेक वस्तूंचा कर कमी केल्यामुळे बहुतेक सर्व राज्यांनीच आपले नुकसान होईल त्याची भरपाई केंद्राने करावी अशी मागणी केलेली आहे. आधीच देशातील बऱ्याच राज्यांची परिस्थिती फारशी चांगली नाही अनेक फुकट्या योजनांमुळे आणि भरमसाठ खर्चामुळे प्रत्येक राज्य कर्जाच्या विळख्यात सापडलेले आहे. यामुळे केंद्राला याचाही विचार करावा लागेल, एकेकाळी उत्पन्नाचा मोठा स्त्रोत असलेल्या जीएसटीला अशा प्रकारे कमी करण्यात आल्यामुळे देशातील सर्वच राज्य सरकारांना चिंता वाटणे स्वाभाविकच आहे, पण त्याचबरोबर सामान्य जनतेला जो दिलासा मिळणार आहे त्याचा आनंद संबंधित राज्य सरकारांनी मानला पाहिजे. आतापर्यंत हॉटेलचे भाडे २०० ते ३०० रुपये असले तरी त्यावर १२% कर होता आता तो पाच टक्क्यांवर आलेला आहे. साध्या कपड्यांवर सुद्धा मोठ्या प्रमाणावर जीएसटीचा दबाव होता त्यातही कपात होणार आहे. आजकाल चांगली पादत्राणे दीड हजार ते दोन हजार रुपयांच्या खाली मिळत नाहीत. त्या ठिकाणी हजार रुपयांच्या वर किंमत असली रे असली की त्या पादत्राणे आणि वहाणांवर १२% जीएसटी लागू व्हायचा. मात्र आता तोच जीएसटी पाच टक्क्यांवर आणण्यात आलेला आहे. तसेच बऱ्याच महागड्या वस्तू २८% जीएसटीच्या स्लॅबमध्ये होत्या त्यापैकी कार, बाईक, थ्री व्हीलर, एसी, फ्रिज, तसेच सिमेंट आणि ३५० सीसीच्या बाईक्स आणि त्यांचे स्पेअर पार्टस हे सरळ सरळ २८ टक्क्यांवरून १८% वर आणलेले आहेत. परंतु यामध्ये मेख अशी आहे की ज्या अतिशय महागड्या आणि अत्यंत चैनीच्या वस्तू किंवा गाड्या आहेत. त्यावर आता ४०% जीएसटीचा कर आकारण्यात येणार आहे. उदाहरणार्थ जो माणूस दोन-तीन कोटींची गाडी घेणार आहे त्याला ४०% कर भरावा लागेल. केंद्र सरकारने केलेल्या सूचनेनुसार जीएसटी परिषदेने अनेक वस्तू शून्य करावर आणलेल्या आहेत, त्यामध्ये मध्यमवर्गीयांसाठी महत्त्वाच्या तसेच खाण्यापिण्याच्या आणि शालोपयोगी वापराच्या नित्योपयोगी गोष्टी जास्त आहेत. जसे दूध, पनीर, पिझ्झा, ब्रेड, रोटी, पराठा या अन्नपदार्थांवरती आता कर लागणार नाही. तसेच शालोपयोगी गोष्टींमध्ये पेन्सिल, कटर, खोडरबर, लिखाणाच्या वह्या या वस्तूही स्वस्त होणार आहेत. विशेष म्हणजे औषधां वरील ह ३३% कर कमी केलेला आहे. त्यामध्ये शाम्पू , साबण, तेल या दैनंदिन वापरातील वस्तू पाच टक्के जीएसटीच्या कक्षेत आणल्या गेलेल्या आहेत. नमकीन पदार्थ, पास्ता, कॉफी नूडल्स यांच्यावरचा जीएसटी पाच टक्के करण्यात आला आहे. थर्मामीटर, ग्लुकोमीटर यांच्यावरचा जीएसटी १८ टक्क्यावरून पाच टक्के करण्यात आला आहे. सगळ्याच वस्तूंची जंत्री या ठिकाणी मांडू शकत नाही. परंतु सरकारने सामान्य आणि मध्यमवर्गीयांचा विचार केलेला दिसते आहे. तरीही सगळ्यात मोठा प्रश्न म्हणजे सरकारला अचानक एवढी सामान्य जनतेची कणव कशी काय बरे आली, हा प्रश्न खरे तर कोणीच विचारू नये. कारण सध्याची आपल्या देशाची परिस्थिती पहा आणि सामान्य जनतेच्या पायावर फुले वाहा, असा राष्ट्रीय कार्यक्रम ठरलेला असतो. भारतीय स्वातंत्र्याची दुंदुभी १५ ऑगस्ट १९४७ साली रात्री बारा वाजता वाजली होती. तशीच याबाबत निर्णयासाठीची घोषणा करताना विशेष अधिवेशन भरवून त्याच रात्री बारा वाजता ही घोषणा करण्यात आली आहे. सर्व देशभर समान कर असावा या उद्देशाने सुरू असलेला जीएसटीचा हा सोपस्कार पुढील कालावधीमध्ये जनोपयोगी ठरो आणि हो, अगदी तसाच सर्व राज्यांना सुखाचा ठरो, अशी अपेक्षा आपण करूया!

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# सर्वांच्या शंकाचे निरसन करू- मुख्यमंत्री

**रायगड, दि. ४ प्रतिनिधी**

**मराठा आरक्षण जीआरचा ओबीसी आरक्षणावर कोणताही परिणाम होणार नाही. मराठ्यांना आणि ओबीसींना त्याच्या हक्काचे आरक्षण मिळेल. आम्ही जे राजकारण शिकलो त्यामध्ये सर्वांना सोबत घेऊन पुढे जाणे हेच ब्रीद आहे. कधीही दोन समाज एकमेकांसमोर आणणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. गुरूवारी ते रायगड येथे माध्यमांशी बोलत होते. दरम्यान, सदर जीआरसंदर्भात राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाली तेव्हा भुजबळ त्या बैठकीतून निघून गेल्याची चर्चा आहे. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्टीकरण दिलं आहे. ते म्हणाले, "छगन भुजबळ हे राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीतून कुठेही गेले नाहीत. त्यांची व माझी चर्चा झाली आहे. मी त्यांना आश्वस्त केलं आहे की आपल्या सरकारने जी अधिसूचना (जीआर) काढली आहे त्याने ओबीसी समाजावर कुठलाही परिणाम होणार नाही. कारण हा सरसकट जीआर नाही. हा केवळ पुराव्याचा जीआर आहे."**

मराठा आंदोलकांच्या मागणीनंतर राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटियरचा स्वीकार करून त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात शासकीय अधिसूचना (जीआर) काढली आहे. परंतु, याला काही ओबीसी नेत्यांनी, संघटनांनी विरोध केला आहे. राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री तथा ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी देखील या जीआरवर आक्षेप नोंदवला आहे. या जीआरविरोधात न्यायालयात धाव घेणार असल्याचं भुजबळ यांनी स्पष्ट सांगितलं आहे.

मुख्यमंत्री म्हणाले, "मराठवाड्यात इंग्रजांचं राज्य नव्हतं. मराठवाड्यात निजामाचं राज्य होतं. त्यामुळे मराठवाड्यातील जातींसंदर्भातील पुरावे हे इतर ठिकाणी मिळत नाहीत. ते केवळ निजामाकडेच म्हणजेच हैदराबाद गॅझेटमध्ये सापडतात. आपण तिथले पुरावे ग्राह्य धरले आहेत. त्या पुराव्यांनुसार जे खरे कुणबी आहेत त्यांनाच हे प्रमाणपत्र मिळणार आहे. त्यामुळे मला असं वाटतं की ज्यांचा हक्क आहे अशांनाच लाभ मिळेल. कोणालाही खोटेपणा करता येणार नाही, असा हा जीआर आहे."

"अनेक ओबीसी संघटनांनी सरकारच्या



जीआरचं स्वागत केलं आहे. अनेक ओबीसी नेत्यांनी स्पष्ट केलं आहे की या जीआरबाबत त्यांच्या मनात शंका नाही. मला वाटतं की आम्ही छगन भुजबळ यांच्या मनातील शंका देखील दूर करू. इतर कोणाच्या मनात शंका असेल तर ती देखील आम्ही दूर करू."

देवेंद्र फडणवीस म्हणाले, "मी एक गोष्ट स्पष्ट करू इच्छितो की या राज्यात आमचं सरकार आहे तोवर ओबीसींवर अन्याय होणार नाही. एका समाजाचं आरक्षण काढून दुसऱ्या समाजाला देण्याचा आमचा विचार नाही. मराठ्यांच्या हक्काचं मराठ्यांना, ओबीसींच्या हक्काचं ओबीसींना मिळेल. दोन समाजांना एकमेकांसमोर आणण्याचा प्रकार इथे घडणार नाही.

### मराठा समाज महाराष्ट्राच्या जडणघडणीतील महत्वाचा घटक

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ओबीसीवर अन्याय होऊ शकत नाही. ओबीसी आरक्षण काढून दुसऱ्याला देणार नाही. मराठा समाज महाराष्ट्राच्या जडणघडणेतील महत्वाचा घटक आहे. त्यांच कल्याण झाले पाहिजे. त्याजबरोबर १८ पगड जातीवरही अन्याय होणार नाही, हीच आमची भावना आहे, असे फडणवीस म्हणाले. मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान दाखल गुन्ह्यांवर बोलताना फडणवीस यांनी सांगितले की, "आताचे गुन्हे उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दाखल झाले आहेत. त्यावर निर्णय उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणूनच घ्यावा लागणार आहे."

### जीआरचा ओबीसीवर परिणाम होणार नाही

"सर्व मराठ्यांना ओबीसीमध्ये टाका, ही मागणी स्विकारलेली नाही. ज्यांकडे अधिकृत पुरावे आहेत, त्यांनाच ओबीसीमध्ये घेतलं जाईल. राष्ट्रीय ओबीसी महासंघाने मराठा आरक्षण जीआरचा अभ्यास केला आहे. या जीआरचा ओबीसीवर कोणताही परिणाम होणार नाही, असं स्पष्ट केल आहे. भूजबळ यांच्याशी बोलण झालं आहे. त्यांच्या मनातीलही शंका दूर करू," असे फडणवीस यांनी सांगितले.

## नागपूरमधील ओबीसी महासंघाचे साखळी उपोषण सहाव्या दिवशी मागे

**नागपूर, दि. ४ प्रतिनिधी**

एकीकडे मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईच्या आझाद मैदानावर उपोषण सुरु केले होते. तर दुसरीकडे मराठा समाजाला ओबीसींमधून आरक्षण देऊ नये, या मागणीसाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघातर्फे संविधान चौकात बबनराव तायवाडे यांच्या नेतृत्वात गेल्या सहा दिवसांपासून साखळी उपोषण सुरु करण्यात आले होते. आज मंत्री अतुल सावे यांनी उपोषण स्थळी भेट दिली. ओबीसी समाजाच्या १४ मागण्यांपैकी १२ मागण्या सरकारने मान्य केल्याची माहिती अतुल सावे यांनी दिल्यानंतर बबनराव तायवाडे यांनी अखेर उपोषण मागे घेतले.



अतुल सावे म्हणाले की, ओबीसी आरक्षणाला गदा येणार नाही याची काळजी घेतली आहे. शेतकऱ्यांचे अतिवृष्टीने जे नुकसान झाले त्यावर प्रक्रिया सुरु केली आहे. ओबीसी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचा विषय आम्ही अर्थ मंत्रालयाकडे पाठवला आहे. राष्ट्रीय ओबीसी महासंघाने आपल्या एकूण १४ मागण्या मांडल्या आहेत. ओबीसी वसतिगृहासाठी नागपूरमध्ये दोन इमारती उपलब्ध करून दिल्या जाण्याचा निर्णय झाला आहे. ओबीसी आर्थिक विकास महामंडळाच्या मागण्यांबाबत आम्ही सकारात्मक आहोत. १८ महामंडळे तयार केली आहेत. ५-५ कोटी रुपयांचा निधी दिलाय, आता ५०-५० कोटी निधी प्रत्येक महामंडळाला देणार आहोत. जिल्ह्याच्या ठिकाणी ओबीसींसाठी अभ्यासिका सुरु करु. महामंडळांना एक हजार कोटी पेक्षा जास्त निधी उपलब्ध होणार आहे, असे त्यांनी म्हटले.

**एक महिन्याच्या आत शासन आदेश काढले जातील**

राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या १२ मागण्या आज सरकारने मान्य केल्या आहेत. आता आपण आपले उपोषण मागे घ्यावे अशी विनंती मंत्री अतुल सावे यांनी बबनराव तायवाडे यांना केली. यानंतर बबनराव तायवाडे यांनी उपोषण थांबवल्याची घोषणा केली. दरम्यान, एक महिन्याच्या आत ओबीसींच्या सर्व मागण्यांचे शासन आदेश काढले जातील, असे आश्वासन अतुल सावे यांनी दिले.

## जेएन पोर्ट – पीएसए टर्मिनलच्या दुसऱ्या टप्प्याचे उद्घाटन

**उरण, दि. ४ प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सिंगापूरचे पंतप्रधान लॉरेन्स वोंग यांच्यासह ऑनलाइन प्रणालीद्वारे मुंबईतील जेएन पोर्ट – पीएसए मुंबई



टर्मिनल (बीएमसीटी) टप्पा २चे उद्घाटन केले. या प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले की ही केवळ महाराष्ट्रासाठीच नव्हे, तर संपूर्ण देशासाठी एक मोठी उपलब्धी आहे. यामुळे आपल्या औद्योगिक क्षमतेत दुपटीने वाढ होईल आणि हजारो रोजगार निर्मिती होतील.

फडणवीस म्हणाले की आजचा दिवस अत्यंत ऐतिहासिक आहे कारण जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणात देशातील सर्वात मोठ्या कंटेनर कार्गो टर्मिनलचे उद्घाटन झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सिंगापूरचे पंतप्रधान वोंग यांनी संयुक्तपणे या टर्मिनलचे उद्घाटन केले.

दरम्यान, जीएसटी सुधारणांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की मी दुसऱ्या पिढीच्या जीएसटी सुधारणांसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानतो आणि जीएसटी परिषदेचेही अभिनंदन करतो. त्यांनी सांगितले की जेव्हा जीएसटी प्रथमच लागू झाला, तेव्हा लोकांना तोट्याची भीती होती आणि एकत्रित कर प्रणालीबद्दल शंका होती, तरीदेखील देशात अभूतपूर्व करसंकलन झाले, ज्यामध्ये महाराष्ट्र अव्वल ठरला.

## जीएसटी कपातीचा निर्णय म्हणजे अमेरिकेच्या ट्रम्प टॅरिफला चोख प्रत्त्युत्तर- एकनाथ शिंदे

**मुंबई, दि. ४ प्रतिनिधी**

केंद्र सरकारने जीएसटीच्या स्लॅबमध्ये मोठा बदल केला असून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी लाल किल्ल्यावरुन सांगितल्याप्रमाणे सर्वसामान्यांना दिवाळीची भेट देण्यात आली आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी जीएसटी २.० अंतर्गत अनेक मोठ्या जीएसटी सुधारणांची घोषणा केली. त्यानुसार, आधी असलेल्या जीएसटीच्या चार स्लॅबपैकी १२टक्के आणि २८ टक्क्यांचा स्लॅब रद्द करण्यात आला. त्यामुळे देशात आता फक्त ५ टक्के आणि १८ टक्के असेल दोनच जीएसटी स्लॅब असतील. मोदी सरकारच्या या निर्णयाचं सर्वत्र स्वागत केलं जात असून राजकीय प्रतिक्रिया देखील समोर येत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यानंतर आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील यावर प्रतिक्रिया देत विरोधकांना टोला लगावला. तसेच, अमेरिकेच्या ट्रम्प टॅरिफला भारताने चोख उत्तर दिलंय, असेही शिंदेंनी म्हटले.




जीएसटी स्लॅब कपातीच्या निर्णयाचा विरोधक देखील फायदा घेणार आहेत, त्यामुळे टीका करताना विरोधकांना मोदीजींच अभिनंदन करावंच लागेल. खऱ्या अर्थाने देशवासीयांची दिवाळी गोड आणि आनंदी करण्याचं काम प्रधानमंत्री मोदींनी केलेलं आहे, त्यांचं मी मनापासून अभिनंदन करतो, त्यांना धन्यवाद देतो. तसेच, अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी देखील मोदीजींच्या मार्गदर्शनाखाली एक सकारात्मक पाऊल टाकलेलं आहे आणि जीएसटी कमी केलेला आहे. आता जे स्लॅब होते ५,१२,१८ आणि २८ आता फक्त ५ आणि १८ हे दोनच स्लॅब राहणार आहेत. त्यामुळे विमा पॉलिसीपासून जीवनाश्यक वस्तूंना केवळ ५% जीएसटी आहे, सर्व सामान्यांना लागणाऱ्या गरजा आणि वस्तूंवरील जीएसटी कमी केला आहे, असेही शिंदेंनी सांगितले.

## कुणाच्याही ताटातील कुणाच्या ताटात जाणार नाही - बावनकुळे

**मुंबई, दि. ४ प्रतिनिधी**

ओबीसी समाजासाठी काल मंत्रिमंडळ उपसमिती जाहीर केली, त्यात भुजबळ, पंकजा मुंडे असे सर्व नेते आहेत. मोदीजींनी ओबीसी आयोगाला संविधानिक दर्जा केंद्रात दिला आहे. ओबीसींच्या योजना कार्यान्वित आहेत का, निधी आहे का? याची देखरेख करण्याची या समितीची जबाबदारी आहे. ओबीसी समाज आहे, त्यात काहींना प्रमाणपत्र मिळत नाही, जात पडताळणी होत नाही, अशा घटकांसाठी काम करायचे आहे, अशी प्रतिक्रिया चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. काँग्रेसने आतापर्यंत तोंडाच्या वाफा फेकल्या आहेत, जातिनिहाय जनगणना केली नाही. आता ओबीसीमध्ये ३५३ जाती आहेत, १८ पगड जातीमधील ओबीसींची जनगणना आहे, त्यात सरकारची काय मदत लागेल हे समिती पाहिल. त्यासोबत आमची भूमिका आहे, मराठा व ओबीसी या दोन्हींची भूमिका आहे. कुणाच्याही ताटातील कुणाच्या ताटात जाणार नाही, असेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले. आता दोन समाजाला समोरासमोर न येता, दोन्हींचे हक्क न डावलता न्याय देण्याचे काम करायचे आहे. कुणाचे हक्क कुणाला जाणार नाहीत, परवाच्या जीआरमध्ये स्पष्ट आहे. ज्या नोंदणी आहेत, त्या दुर्लक्षित राहिल्या, त्यामुळे दाखले देत नव्हते. या जीआर मुळे ज्या नोंदणी गॅझेटमध्ये आहेत, त्या तपासून नोंदणीप्रमाणे ओबीसी प्रमाण पत्र मिळणार आहे, अशी माहितीही बावनकुळे यांनी दिली. आताच्या आंदोलकांची मागणी हीच होती, ज्या नोंदणी आहेत त्यांना प्रमाणपत्र द्या. वडिलांची नोंद असेल तर मुलाच्या नोंदीची गरज नाही, असेही बावनकुळेंनी स्पष्ट केले.



## आठ दिवसांत गुन्हा दाखल करा, अजित पवारांनी राजीनामा द्यावा

### महिला आयपीएस अधिकाऱ्याला तंबीप्रकरणी खुपसेंची टीका

**सोलापूर, दि. ४ प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील कुर्डू गावात अवैध मुरुम उत्खननाविरोधात कारवाईसाठी गेलेल्या करमाळा विभागाच्या पोलिस उपअधीक्षक अंजली कृष्णा आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यातील फोन संभाषण व व्हिडीओ कॉल प्रकरण सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या प्रकरणी आता राजकीय प्रतिक्रिया समोर येत आहेत. दरम्यान, करमाळ्यातील शेतकरी संघटनेचे नेते अतुल खुपसे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर टीका केली.

"माढा तालुक्यातील कुर्डू गावात एक महिला आयपीएस अधिकारी बेकायदेशीर मुरुम उपसा करणाऱ्यावर कारवाई करायला जाते. अजित पवारांचे कार्यकर्ते वेढा टाकतात आणि अजितदादांना फोन करतात. यावेळी अजित पवार बोलतात तुझी दादागिरी झाली, तुझ्यावर कारवाई करेन. म्हणजे एका बाजूने लाडकी बहीण योजना आणता दुसरीकडे आपल्या मुलीच्या वयासारख्या असणाऱ्या महिला अधिकाऱ्याला दम दिला जातो, असा आरोप खुपसे यांनी केला.

त्या महिला अधिकाऱ्याला चक्कर येते. प्रांत आणि तहसिलदारांच्या अंगावर लोक जातात. तलाठ्याला मारहाण होते. अजित पवारांचा फोन झाल्यानंतर त्यांना तिथून पळवण्यात येते. पण, अद्याप गुन्हा दाखल झालेला नाही. बीडचे वातावरण शांत करायला तुम्ही तिकडे पालकमंत्री झाला पण सोलापुरचे वातावरण विचित्र झाले आहे, अशी टीका अतुल खुपसे यांनी केली.

अतुल खुपसे म्हणाले, आयपीएस अधिकाऱ्यांना जर काम करता येत नसेल, स्पिकर फोन करुन मानहानी होत असेल तर येणाऱ्या आठ दिवसात गुन्हा दाखल झाला नाही तर अजित पवार यांचा राजीनामा घ्यावा. लाडक्या बहीणांची माफी मागावी. नाहीतर आम्ही सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढणार, असा इशारा अतुल खुपसे यांनी दिला.

## दक्षिण मुंबईत आंदोलनांवर बंदी घालण्याच्या मिलिंद देवरा यांच्या पत्रावरून संताप

### मराठी एकीकरण समितीची तीव्र प्रतिक्रिया

**मुंबई, दि. ४ प्रतिनिधी**

राज्यसभेतील खासदार आणि शिंदेंच्या शिवसेनेचे नेते मिलिंद देवरा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून आझाद मैदानासह दक्षिण मुंबईतील ठिकाणी वारंवार होणाऱ्या आंदोलनांवर निर्बंध आणण्याची मागणी केली आहे. या पत्रात त्यांनी आंदोलनांचे ठिकाण दक्षिण मुंबईऐवजी इतरत्र हलवण्याची सूचना केली आहे.

देवरांनी म्हटले आहे की, दक्षिण मुंबई हे राज्याच्या शासन, सुरक्षा आणि अर्थकारणाचे केंद्र असून, येथे मुख्यमंत्री सचिवालय (मंत्रालय), विधीमंडळ, मुंबई महानगरपालिका मुख्यालय, पोलिस दलाची कार्यालये तसेच वेस्टर्न नेव्हल कमांड यांसारख्या महत्वाच्या संस्था आहेत. त्यामुळे येथे होणाऱ्या मोठ्या आंदोलनांमुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनात व्यत्यय येतो आणि शासन, सुरक्षा तसेच खासगी क्षेत्राच्या कामकाजावर परिणाम होतो. म्हणूनच अशा आंदोलनांना इतर ठिकाणी हलवण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी पत्रातून स्पष्ट केले आहे. तथापि, या पत्रावरून मराठी एकीकरण समितीचे प्रमुख दीपक पवार यांनी तीव्र प्रतिक्रिया नोंदवली आहे. त्यांनी म्हटले आहे, "बाप बदलला की विचार बदलतात असं नाही. हा आणि याचा सख्खा बाप यांचे विचार इतकेच मराठीद्वेष्टे होते. मिलिंद देवरा यांच्या पत्राची दक्षिण मुंबईतच होळी झाली पाहिजे." देवरांच्या पत्रामुळे मराठी समाजात संतापाची लाट उसळली असून, आंदोलने हा लोकशाही हक्क असून त्यावर कुठल्याही प्रकारचे निर्बंध घालणे योग्य ठरणार नाही, असे मराठी संघटनांचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस काय निर्णय घेतात, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## जीएसटीच्या नव्या कर रचनेचा कोणाला होणार फायदा?

### दूध, पनीर, एसी, कार – काय स्वस्त आणि काय होणार महाग?

**नवी दिल्ली, दि. ४ वृत्तसंस्था**

जीएसटी परिषदेची ५६ वी बैठक दिल्लीत संपन्न झाली. देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. जीएसटीचे आता फक्त दोन स्लॅब असतील. ५ टक्के जीएसटी आणि १८ टक्के जीएसटी. १२ आणि २८ टक्के जीएसटीचा स्लॅब सरकारने संपुष्टात आणला आहे. २२ सप्टेंबरपासून ही कर प्रणाली लागू केली जाणार आहे. काय स्वस्त होणार आणि काय महागणार हे जाणून घेऊ.

**कुठल्या वस्तुंवर शून्य टक्के जीएसटी?**

अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी पत्रकार परिषदेत फक्त दोन टॅक्स स्लॅब असतील अशी घोषणा केली आहे. त्यात अनेक जीवनावश्यक वस्तू या झीरो जीएसटीमध्ये



समाविष्ट करण्यात आल्या आहेत. ज्यामध्ये दूध, पनीर, पिझ्झा ब्रेड, रोटी, पराठा या वस्तूंवर काहीही जीएसटी लागणार नाही असा प्रस्ताव आहे. त्यामुळे लोकांना दिलासा मिळणार आहे. तसंच पेन्सील, कटर, खोडरबर आणि वह्या यांवरच्या १२ टक्के जीएसटी हटवण्यात आला आहे. त्यामुळे या वस्तूही स्वस्त होणार आहेत. याशिवाय ३३ औषधांवरचा जीएसटीही शून्य करण्यात आला आहे त्यामुळे ही औषधंही स्वस्त होतील. यासह शॅम्पू, साबण, तेल या दैनंदिन वापरातील वस्तू ५ टक्के जीएसटीच्या कक्षेत आणल्या गेल्या आहेत. नमकीन पदार्थ, पास्ता, कॉफी, नूडल्स यांच्यावरचा जीएसटीही ५ टक्के करण्यात आला आहे. थर्मामीटर आणि ग्लुकोमीटर यांच्यावरचा जीएसटीही १८ वरुन ५ टक्के करण्यात आला आहे त्यामुळे या वस्तूही स्वस्त होणार आहेत. चीज आणि लोणी यावरचा टॅक्स १२ वरुन ५ टक्के करण्यात आला आहे. त्यामुळे चीज आणि लोणीही स्वस्त होणार आहे.

**२८ टक्के जीएसटी असलेल्या वस्तू १८ टक्क्यांच्या स्लॅबमध्ये**

कार, बाईक, थ्री व्हिलर, एसी, फ्रिज अशा सगळ्या वस्तूंवर असलेला २८ टक्के जीएसटी आता १८ टक्के करण्यात आला आहे. तसंच सिमेंटवरचा जीएसटीही १८ टक्के करण्यात आला आहे. ३५० सीसीच्या बाईक आणि त्यांचे ऑटो पार्ट्स हेदेखील १८ टक्क्यांच्या कक्षेत आणण्यात आले आहेत. त्यामुळे या सगळ्या गोष्टी स्वस्त होतील.

**दिल्लीत १० तास चाललेल्या बैठकीत मोठा निर्णय**

दिल्लीतील सुषमा स्वराज भवन येथे बुधवारी झालेल्या जीएसटी काउन्सिलच्या मॅरेथॉन बैठकीत कर प्रणालीत मोठा बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला. तब्बल १० तासांपेक्षा जास्त चाललेल्या या बैठकीत १२ टक्के आणि २८ टक्क्यांचे स्लॅब पूर्णपणे रद्द करण्यात आले आहेत. नव्या नियमानुसार आता ५ टक्के आणि १८ टक्के असे फक्त दोनच स्लॅब राहणार आहेत. केंद्र सरकारच्या या महत्त्वाच्या निर्णयामुळे व्यापारी तसेच सामान्य नागरिकांना दिलासा मिळण्याचे संकेत आहेत.

# मराठा आरक्षणाचे आंदोलन संपताच मराठा सेवकांनी गाठला रायगड किल्ला

**निलेश लोखंडे । महासागर**

**महाड,** मराठा आरक्षणासाठी विदर्भ मराठवाड्यासहित उत्तर महाराष्ट्र व राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेले हजारो मराठा सेवकांनी मराठा आरक्षणाचे आंदोलन संपतात थेट रायगड किल्ला गाठला रायगडावर पुन्हा एकदा जय भवानी जय शिवाजी छत्रपती शिवाजी महाराजांचा जयजयकार अशा घोषणांनी रायगड पुन्हा एकदा गजबजल्याचे चित्र रायगडच्या पायथ्याशी पहावयास मिळाले मुंबईमधील आझाद मैदान येथे 29 ऑगस्ट पासून संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी आमरण उपोषण चालू केले होते मात्र मराठा आरक्षण उपससमितीने राज्य सरकारच्या वतीने उपोषण करते जरांगे पाटील यांना त्यांनी केलेल्या मागण्यांचा प्रस्ताव मान्य केल्याने संघर्ष योद्धा जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घेतल्याने मुंबई पाहून व मुंबईत उपोषणाच्या ठिकाणी वास्तव्य करून माघारी गावी निघालेल्या लाखो मराठा सेवकांपैकी अनेकांनी थेट रायगड किल्ला गाठल्याचे पहावयास मिळाले.



# रायगड जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

**रत्नाकर पाटील। महासागर**

**अलिबाग,** रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागामार्फत देण्यात येणारे जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. २०२५/२६ या शैक्षणिक वर्षासाठी जिल्हाभरातील १७ शिक्षकांची निवड आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी करण्यात आली असल्याची माहिती, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व प्राथमिक शिक्षण अधिकारी ललिता दहितुले यांनी दिली आहे. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांचा ५ सप्टेंबर हा जन्म दिवस दरवर्षी शिक्षक दीन म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांना त्यांच्या चांगल्या कामगिरीसाठी आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. जिल्ह्यातील १७ शिक्षकांची निवड आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी करण्यात आली आहे.

अलिबाग तालुक्यातील मनोहर पाटील यांची जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली असून, पेण तालुका किशोर पाटील, पनवेल तालुका योगिनी वैदू, कर्जत संज्योती कांबरी, खालापूर तालुका किर्ती धारणे, उरण तालुका अजित जोशी, सुधागड तालुका वृषाली गुरव, रोहा तालुका प्रसाद साळवी, महाड तालुका वसंत साळुंखे, श्रीवर्धन तालुका सीमा चव्हाण व नारायण खोपटकर, म्हसळा तालुका शशीकांत भिंगारदेव, पोलादपूर तालुका विजय पवार, माणगाव सुजाता मालोरे व परेश अंधेरे, तळा तालुका उल्का मोडकर, मुरुड तालुका हेमकांत गोयजी यांना जिल्हा आदर्श पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.





बोर्लीपंचतन येथील दिपक दिवेकर यांचा घरचा गणपती

## गणेशोत्सवानंतर चाकरमान्यांचा परतीचा प्रवास सुरु

# तळा बसस्थानकात प्रवाशांची गर्दी

**श्रीकांत नांदगावकर । महासागर**

**तळा,** आपल्या लाडक्या बाप्पाला भावपूर्ण निरोप दिल्यानंतर गणेशोत्सवासाठी गावाला आलेले चाकरमानी पुन्हा परतीच्या प्रवासाला लागले आहेत.यामुळे तळा बस स्थानकात प्रवाशांची गर्दी झाल्याचे चित्र पहायला मिळत आहे.कोकणात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यासाठी मोठ्या संख्येने नोकरी धंद्यासाठी व कामानिमित्त शहरांमध्ये स्थलांतरित झालेले नागरिक गणेशोत्सवासाठी आपल्या गावी परतत असतात. यानिमित्ताने वर्षभरातून एकदा संपूर्ण कुटुंब एकत्र येऊन सुखदुःखाच्या गोष्टी रंगतात. दैनंदिन जीवनातील आठवणींची देवाणघेवाण होते.गणेशोत्सव काळात पाच दिवस गणरायाची मनोभावे पूजा अर्चा,आरती, भजन करून शेवटच्या दिवशी बाप्पाला भावपूर्ण वातावरणात निरोप देऊन पुढल्या वर्षी लवकर या असा आग्रह धरून चाकरमानी पुन्हा आपल्या परतीच्या प्रवासाला लागले आहेत.यासाठी तळा बसस्थानकात बसमध्ये आपली आरक्षित केलेली जागा शोधण्यासाठी प्रवाशांची लगबग पाहायला मिळाली.चाकरमानी प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी एसटी प्रशासनाकडून बसस्थानकातून दोन दिवस एसटीची जादा वाहतूक व्यवस्था करण्यात आली होती.





# संशयचा भूत डोक्यात गेलेल्या भावाकडून सख्या भावाला लोखंडी सळईने जबर मारहाण,



**संतोष सातपुते । महासागर**

**रोहा,** आपल्या पत्नी सोबत अनैतिक संबध असल्याचा संशयाचा भूत डोक्यात गेलेल्या भावाने आपल्या सख्या भावाला लोखंडी सळईने जबर मारहाण करुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला.व हल्ला करुन आरोपी घटनास्थळा वरून फरार झाला. मात्र मध्यरात्री पोलिसांनी त्याला अटक करुन बेड्या ठोकल्या आहेत.हा धक्कादायक प्रकार धाटाव परिसरातील महादेववाडी गावात घडला असून या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

मंगळावार ( ता.२) रोजी सायंकाळी६:३० वा.च्या सुमारास महादेववाडी गावातील सर्व ग्रामस्थ गणपती विसर्जनासाठी विसर्जनघाटावर गेले असताना याचं दरम्यान कारविणे गावातील शिद कुटुंब गणेशोत्सवासाठी महादेववाडी या मूळ गावात आले होते. शिद कुटुंबातील सदस्य देखील गणपती विसर्जनासाठी नदीकाठी गेले असता आरोपी लहू गुणाजी शिद याने या संधीचा फायदा घेत आपल्या पत्नीचे सोबत भावाचे अनैतिक संबंध असल्याचा संशय घेत व याच रागातून त्याने घराच्या ओटीवर बसलेल्या भावावर लोखंडी सळईने डोक्यात वार करून जीवघेणा हल्ला करुन त्याला ठार मारण्याचा प्रयत्न केला.रक्ताच्या थारोळ्यात जखमी करुन घटना स्थळावरून तो फरार झाला.या गंभीर घटनेचे वृत्त परिसरात वाऱ्या सारखे पसरले आणि गावकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. या घटनेमुळे गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले.या घटनेत जखमी रमेश शिद याला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.या घटनेची माहिती समजताच पोलीस निरीक्षक मारुती पाटील आपल्या टिम समवेत घटनास्थळी दाखल झाली. घटनेची माहिती घेतल्यानंतर पोलिसांनी आरोपीची शोधमोहिम सुरु केली.मध्यरात्री साडेतीन वा. च्या सुमारास आरोपीला ताब्यात घेऊन त्याला तात्काळ पोलिसांनी अटक करुन त्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या बाबत त्याची पत्नी सुवर्णा लहू शिद हिने पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

# बाणकोट बौद्धवाडीच्या रस्त्याचे काम अर्धवट

# निधी भ्रष्टाचाराच्या भोवऱ्यात

**सोपान निंबरे । महासागर**

**श्रीवर्धन ,** मौजे बाणकोट मधील बौद्धवाडीचे अंतर्गत जाणाऱ्या रस्त्याचे काम ठेकेदाराने अर्धवट ठेवल्याने नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. कामाची चौकशी केली असता ग्रामस्थांना बांधकाम अधिकारी यांकडून उडवाउडवीची उत्तरे दिली जात आहेत. चौकशी साठी फोन केले असता मोबाईल सेटिंगमध्ये बदल केल्याचे दिसून आले. मोबाईल एक रिंग वाजून कट होतो. काही दिवसातच या कामाची मुदत संपणार असून अधिकारी व ठेकेदार यांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे. यामुळे निधीमध्ये भ्रष्टाचार झाले असल्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. सदरील रस्त्याचे काम पर्यटन विकास अंतर्गतमधून असून हे काम गणेश कन्स्ट्रक्शन चिपळूण ही कंपनी करत आहे.

बौद्धवाडी ते मुख्य रस्त्याला जोडणारे अंतर्गत रस्त्याची अनेक वर्षांपासून दुर्दशा होती ग्रामस्थांच्या अटळ प्रयत्नाने पर्यटन विकास निधी प्राप्त करून घेतली असे असताना ठेकेदार व बांधकाम अभियंता यांच्या हलगर्जीपणामूळे काम अर्धवट राहिला आहे

ठेकेदार याच्या कामाचा दिखावा व कामचुकार पणामुळे रस्त्यावर टाकण्यात आलेली माती पावसाने वाहून गेली आहे. वाहतूक सोडाच तर ग्रामस्थांना पायी चालता देखील येत नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. रस्त्याच्या अर्धवट कामामुळे स्थानिक नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. मंडणगड बांधकाम अभियंता यांनी तातडीने लक्ष घालून प्रलंबित काम पूर्ण करून घ्यावे, अशी नागरिकांची मागणी आहे.

वारणवार तक्रारी करून देखील मंडणगड अभियंता याकडे दुर्लक्ष करत आहेत. हे लक्षात घेता दिनेश पवार व ग्रामस्थांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे यांना देखील तक्रार निवेदन देले आहे.



"ठेकेदाराने रस्त्याचे काम अर्धवट ठेवल्याने ग्रामस्थांना अनेक अडचणीचा सामना करावा लागत आहे. अर्धवट व निकृष्ट कामाचे फोटो व्हिडीओ सह माहिती कार्यकारी अभियंता सा. बां.वि. चिपळूण व उप विभाग मंडणगड येथील अधिकारी यांना दिली असून देखील याकडे अधिकारी यांच्याकडून दुर्लक्ष करण्यात येत आहे. नक्कीच यामध्ये निधीमध्ये भ्रष्टाचार झाले असावे शासनाने तातडीने लक्ष घालून प्रलंबित काम मुदत संपुष्टात येण्यापूर्वी पूर्ण करून घ्यावे कामचुकार ठेकेदार याला काळ्या यादीत टाकावे

**बौद्धवाडी ग्रामस्थ दिनेश पवार"**

# मुरुड एसटी आगरात गॅस पंप त्वरित होण्यासाठी अधिकारी वर्गांनी तातडीने कार्यवाही करा !

## खासदार सुनील तटकरे यांचे अधिकारी वर्गाला आदेश

**संजय करडे । महासागर**

**मुरुड,** मुरुड तालुका हा पर्यटन तालुका असून येथे दरवर्षी लाखो पर्यटक भेटी देत असतात.काशीद समुद्र किनारा त्याचप्रमाणे मुरुड समुद्र किनारा व येथे असणारा ऐतिहासिक जंजिरा किल्ला पहाण्यासाठी देशाच्या विभिन्न भागातून पर्यटक मोठ्या संख्येने येण्याचे प्रमाण आहे.मुंबई ,ठाणे व अन्य भागातून येणाऱ्या पर्यटकांची संख्या खूप मोठी असून काही पर्यटक एसटीचा सुद्धा वापर करीत असतात.

एसटीने मुरुड येथे जलद गतीने पोहचण्यासाठी मुरुड आगार येथे महानगर गॅस पंप जलद गतीने पूर्ण होण्यासाठी संबंधित सर्व अधिकारी वर्गांनी तिथे जाऊन तातडीने पहाणी करून गॅस पंपचे काम जलद गतीने पूर्ण करण्यात यावेत असे आदेश रायगड चे खासदार व केंद्र शासनाच्या पेट्रोलियम अँड नॅचरल गॅस चेअरमन सुनील तटकरे यांनी दिले आहेत.त्यामुळे आता लवकरच मुरुड येथे गॅस पंप होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



आज मंत्रालय येथे खासदार सुनीलजी तटकरे यांच्या समवेत महावितरण गॅस लिमिटेड व एसटी महामंडळाचे सर्व वरिष्ठ अधिकारी यांच्या समवेत बैठक झाली. या बैठकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे रायगड जिल्ह्याचे उपाध्यक्ष मंगेश दांडेकर, मुरुड तालुका अध्यक्ष फैरोझ घलटे, मुरुड तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेरमन मनोज भगत, सोशल मीडिया सेलचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष हसमुख जैन, वावडुंगी ग्रामपंचायतचे माजी सरपंच अजित कासार, आगरदांडा ग्रामपंचायत सरपंच आशिष हेदुलकर , कोळी समाज नेते प्रकाश सरपाटील, युवा कार्यकर्ते निखिल पाडगे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.यावेळी उपस्थित महानगर गॅस ऍथॉरिटी कंपनी चे अधिकारी व एसटी महामंडळातील अधिकारी वर्गांनी येत्या दोन दिवसाच्या आत मुरुड आगारचा पहाणी करून गॅस पंप यासाठी सुनियोजित जागा निश्चित करून तातडीने गॅस पंप होण्यासाठी जलद गतीने काम पूर्ण करण्याचे आदेश यावेळी त्यांनी दिले.कोणत्याही परस्थिती हे काम जलद गतीने होण्यासाठी अधिकारी वर्गांनी तत्परता दाखवावी व असंख्य प्रवासी वर्गाला दिलासा द्यावा असे ते यावेळी म्हणाले.मुरुड आगाराची खूप मोठी जागा असल्याने येथे गॅस पंप होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# "कुल" कडून उच्च न्यायालयातील याचिका मागे

## अभय योजनेंतर्गत शास्तीमध्ये मिळणार तब्बल 1 कोटी 37 लाखांची सूट

**दत्ता कुलकर्णी । महासागर**

**पनवेल,** पनवेल महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागामार्फत करदात्यांना दिलासा देण्यासाठी 'अभय योजना' राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत दिनांक 15 सप्टेंबर पर्यंत शास्तीवरती ९० टक्के सुट राहणार आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील मालमत्तांधारकांबरोबरच तळोजा औद्योगिक वसाहतीमधील मालमत्ताधारकांना अभय योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी केले आहे.

तळोजा औद्योगिक वसाहतीमधील मालमत्ताधारकांनी अभय योजनेचा लाभ घेण्यास सरुवात केली आहे. यामध्ये कुल सोल्यूशन्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने देखील"अभय योजनेचा लाभ घेण्यासाठी उच्च न्यायालयातील मालमत्ता कराबाबत असणारी याचिका मागेघेतली आहे.उच्च न्यायालयात जमा केलेले ३ कोटी रुपये आता पनवेल महानगरपालिकेत जमा होणार आहेत. अभय योजनेत भाग घेतल्यास "कुल" ला तब्बल 1 कोटी 37 लाख इतका फायदा होणार आहे.

पनवेल महानगरपालिकेमार्फत आकारण्यात येणार मालमत्ता कर हा कायदेशीर असल्याची जाणीव झाल्याने आता अनेक कंपन्यांनी अभय योजनेचा मार्ग स्वीकारून कर भरण्याचा पर्याय निवडत असल्याचे दिसून येत आहे."अभय योजना" ही कंपन्यांसाठी एक सुवर्ण संधी असून सर्व मालमत्ता कर एकरकमी भरल्यास शास्तीच्या रकमेत ९० टक्के म्हणजे मोठ्या प्रमाणात सूट मिळत आहे. त्यामुळे तळोजा औद्योगिक वसाहतीमधील इतर मालमत्ताधारकांनी आपला मालमत्ता कर भरून महापालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले आहे.

महापालिकेच्या वतीने करदात्यांना ई-बिल स्वीकारणे, डिजिटल पद्धतीने कर भरणे यासाठी प्रोत्साहित केले जात असून, असे केल्यास अतिरिक्त 2 टक्के सवलतीचा लाभ मिळू शकतो. तसेच ऊर्जा बचत, जल पुनर्भरण, कचरा व्यवस्थापन, पर्यावरणपूरक उपक्रम यामध्ये सहभाग घेणाऱ्या करदात्यांना देखील 2 टक्के सवलतीची तरतूद करण्यात आली आहे.



**कर-मित्र' चॅटबॉट**

नागरिकांना अधिक सोयीस्कर, वेगवान आणि पारदर्शक सेवा देण्यासाठी पनवेल महानगरपालिकेने 'कर-मित्र' चॅटबॉटची सुविधा सुरू करण्यात आली आहे.. हा अत्याधुनिक चॅटबॉट मालमत्ता करदात्यांना घरबसल्या त्वरित माहिती, मार्गदर्शन आणि ऑनलाइन मदत पुरवेल.

पनवेल महानगरपालिकेच्या panvelmc.org या अधिकृत संकेतस्थळावर तसेच PMC TAX APP आणि Panvel Connect App द्वारे ऑनलाइन कर भरता येणार आहे. या योजनेचा लाभ घेऊन प्रलंबित कर तत्काळ भरावा, असे आवाहन आयुक्त उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले आहे

ही अभय योजना 24x7 सुरू असून यासाठी महापालिकेने नवीन मालमत्ता कर संकलन केंद्रे सुरू केली आहेत.

1. मालमत्ता कर संकलन केंद्र – प्राईड सोसायटी सेक्टर 7, खारघर
2. महा ई सेवा केंद्र – गंगा टॉवर, सेक्टलर 21 कामोठे
3. महा ई सेवा केंद्र – ऍलियश बिल्डींग से17 प्लॉट नं84 मोठा खांदा नवीन पनवेल
4. सर्व 5 प्रभाग कार्यालये (नावडे उपविभागासहित)
5. मुख्यालय पनवेल

तरी आत्ता आणि एकदाच असलेल्या अभय योजनांचा लाभ संबधित नागरिकांनी घ्यावा असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

# आयएसओ मानांकित नवघर शाळेतील विद्यार्थी आधुनिक वाचनालयात गिरवणार ज्ञानकन

## ग्राम युक्ती संस्थेच्या वतीने बांधलेल्या वाचनालयाचे उदघाटन

**गौसखान पठाण । महासागर**

**सुधागड,** आयएसओ मानांकित रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा नवघर येथील विद्यार्थी आधुनिक वाचनालयात ज्ञानकन गिरवणार आहेत. ग्राम युक्ती संस्थेच्या वतीने बांधकाम करण्यात आलेल्या वाचनालयाचे नुकतेच मान्यवरांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले.

ग्राम युक्ती संस्थेच्या माध्यमातून संस्थेचे अध्यक्ष कॅप्टन सूर्यकुमार राव व संचालिका नागमणी राव यांनी शाळेसाठी वाचनालय बांधून दिले आहे. त्यांच्या हस्ते वाचनालयाचे उदघाट्न झाले. या वाचनालयातील पुस्तकांचे वाचन करून विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाच्या कक्षा व भाषिक कौशल्ये वाढवावीत, आपल्यातील कलागुणांचा विकास करावा आणि स्पर्धा परीक्षांची तयारी करावी अशी अपेक्षा उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

यावेळी नवघर ग्रामपंचायतीचे सरपंच माई चव्हाण, उपसरपंच संजय मोरे, माजी सभापती रमेश सुतार, माजी उसरपंच डी. सी. चव्हाण, ग्राम युक्ती संस्थेचे संचालक राम चव्हाण,भारतीय नौदलातील जवान वैभव येसने,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राकेश जाधव, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर सुतार, माजी अध्यक्ष रविंद्र जाधव, केंद्र प्रमुख अनिल राणे, पोलीस पाटील किशोर दळवी ज्ञानप्रबोधिनी सुधागड तालुका प्रमुख अनिल गुरव यांची प्रमुख उपस्थितीती होती.

सुधागड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी सादुराम बांगारे यांनी नवघर शाळेसाठी सुसज्ज असे वाचनालय बांधून दिल्याबद्दल ग्रामयुक्ती संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब व नागमणी राव यांचे आभार मानले.

या कार्यक्रमासाठी नवघर ग्राम पंचायतीचे ग्राम अधिकारी गोरड, सदस्य, शिक्षक पालक संघांचे अध्यक्ष, ग्रामस्थ व आजी माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद म्हात्रे, संगीता बैकर, वृषाली गुरव, शीतल पाटील, अनुजा माने, रुपाली लेंडवे, अंकिता जाधव व शाळेतील आजी माजी विद्यार्थ्यांनी मोलाचे सहकार्य केले.



**मूळ हेतू :** विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, शब्दसंग्रह वाढविणे, भाषिक कौशल्य निर्माण करणे, विचार करण्याची क्षमता वाढविणे, ज्ञानाची कक्षा उंचावणे, जगातील विविध घडामोडीची माहिती मिळविणे या हेतूने वाचनालयाची निर्मिती करण्यात आली आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सव वर्ष पदार्पणनिमित्त रविवारी वावर्ले येथे रक्तदान शिबिर

**दत्ता कुलकर्णी । महासागर**

**पनवेल,** दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे ७५ व्या वर्षात पदार्पण अर्थात अमृत महोत्सव वर्षनिमित्त भारतीय जनता युवा मोर्चाच्यावतीने दर महिन्याच्या पहिल्या रविवारी रक्तदान शिबिर उपक्रम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने भारतीय जनता युवा मोर्चा खालापूर मंडलाच्या वतीने रविवार दिनांक ०७ सप्टेंबर रोजी खालापूर तालुक्यातील वावर्ले येथे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्ष पदार्पणानिमिताने विविध समाजोपयोगी कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने रायगड जिल्ह्यातील रक्ततुटवडा भरून काढण्यासाठी एक विशेष"रक्तदान उपक्रम" सुरु करण्यात आले आहे. त्यामध्ये दर महिन्याच्या पहिल्या रविवारी भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात येत आहे. हा उपक्रम संपूर्ण वर्षभर राबविण्यात येणार असून, विशेषतः थॅलेसिमिया ग्रस्त रुग्णांसाठी आणि इतर गरजू रुग्णांसाठी या रक्तदान उपक्रमाचे मोठे योगदान ठरणार आहे. आतापर्यंत पनवेल, खारघर आणि खांदा कॉलनी येथे हे शिबीर यशस्वी आयोजन आणि उत्स्फूर्त प्रतिसादात पार पडले. वावर्ले येथे होणारे हे शिबीर मालिकेतील चौथे असून अधिक माहितीसाठी मनोज पारठे ९०९६१८९५५५, निखिल पाटील ७०८३९३९००, भरत मांडे ८८९८७३२३५, किंवा स्वप्रिल ठोंबरे ९२०९८७६२९५ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.





रोहा-अष्टमीची कन्या जिद्द,चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर आमच्या भगिनी अॅड.दीप्ती राजेंद्र खुळे हिला भारत सरकार कडून नोटरी प्रमाणपत्र मिळाल्याबद्दल अॅड.दीप्तीचे हार्दिक अभिनंदन करताना त्वष्टा कांसार समाज अष्टमी रोहा कार्यकारिणी (फोटो संतोष सातपुते)

# आदिवासी कुटुंबांना कुक्कुटपालन व्यवसायाची जोड

## शबरी महामंडळाच्या उपक्रमातून स्वावलंबनाची नवी संधी

**कासा, दि. ४ : प्रतिनिधी**



शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या माध्यमातून विशेष केंद्रीय सहाय्य योजनेअंतर्गत कुक्कुटपालन हा प्रकल्प नानिवली येथील जन्मभूमी कॉप शॉप सहकारी संस्था मर्यादित यांना मंजूर करण्यात आला आहे. या प्रकल्पाअंतर्गत १० आदिवासी कुटुंबांना घराजवळ कुक्कुटपालनासाठी प्रत्येकी १ पिंजरा व ३० अंडी देणारी कोंबडीची पिले देण्यात आली आहे.

याठिकाणी एकूण १० पिंजरे व ३०० कोंबडी पिले वाटप करण्यात आली आहेत. या प्रकल्पाचा उद्देश आदिवासी कुटुंबांना गावातच पूरक उद्योग उपलब्ध करून देणे, त्यांना स्वावलंबी करणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करणे हा आहे. कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते लाभार्थ्यांना कुक्कुटपालनासाठी पिंजरे वाटप करण्यात आले. यावेळी शबरी महामंडळाचे व्यवस्थापक (कोकण विभाग) राजेश पवार, प्रादेशिक व्यवस्थापक (जव्हार) योगेश पाटील, सहकारी संस्थेचे अध्यक्ष निलेश सवरा, स्थानिक लोकप्रतिनिधी व शेतकरी उपस्थित होते.

अधिकाऱ्यांनी लाभार्थ्यांना प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत मार्गदर्शन करताना कुक्कुटपालन व्यवसायातील संधी, बाजारपेठेतील मागणी आणि तांत्रिक बाबींची सविस्तर माहिती दिली. या उपक्रमामुळे आदिवासी कुटुंबांना अतिरिक्त उत्पन्नाचा मार्ग खुला होणार असून महिलांनाही रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. विशेषतः ग्रामीण व आदिवासी भागातील बेरोजगार तरुणांना रोजगार मिळण्याबरोबरच प्रशिक्षित कामगारांची निर्मिती होणार आहे. शबरी महामंडळाच्या या उपक्रमामुळे शेतकरी उत्पादक कंपन्यांची मजबुती, आदिवासी भागातील उत्पादनवाढ आणि स्थानिक बाजारपेठेतील मागणी पूर्ण करण्यास हातभार लागेल, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

# भूमी अभिलेख कार्यालयाच्या बोगस नकाशाद्वारे बांधकाम परवानगी

## महापालिकेकडून बांधकाम परवानगी रद्द

**वसई, दि. ४ : प्रतिनिधी**

वसई विरार परिसरात बोगस सीसीच्या माध्यमातून शेकडो बेकायदा बहुमजली इमारती बांधल्या गेल्याचे दिसत असताना आणि ४१ अनधिकृत इमारतीप्रकरणात ईडीकडून मोठी कारवाई केली जात असतानाच एका बिल्डरने चक्क भूमी अभिलेख कार्यालयाचा बोगस नकाशा सादर करून वसई विरार महापालिकेकडून बांधकाम परवानगी घेतल्याची बाब प्रहार जनशक्ती पक्षाचे युवा संघटक चंदू पाटील यांनी उजेडात आणली आहे. याप्रकरणी महापालिकेच्या नगर रचना विभागाने सदरची बांधकाम परवानगी रद्द केली आहे. याप्रकरणी बिल्डरविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करून आर्किटेक्टचा परवाना रद्द करण्याची मागणी पाटील यांनी केली आहे.

वसई पूर्वेकडील पेल्हार गट क्र. १५८/१/ब, १७८/१/क व १५९/४ येथील या जमिनीवर वसई-विरार महापालिकेच्या नगर रचना विभागाने बनावट मोजणी नकाशाच्या आधारावर बांधकाम परवानगी (VP - ६११०) दिली होती. वास्तुविशारदाने बनावट नकाशा सादर केला आणि विकासकाने त्याचा गैरवापर करून बेकायदेशीर बांधकाम सुरू केले होते. याप्रकरणी चंदू पाटील यांनी पालघर जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार केली होती. याप्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांनी उपजिल्हाधिकाऱ्यांची चौकशी समिती नेमली होती. त्यात आर्किटेक्टने वसई भूमी अभिलेख कार्यालयातील बोगस नकाशा सादर करून वसई विरार महापालिकेकडे बांधकाम परवानगीसाठी अर्ज केला होता. त्यावर महापालिकेने बांधकाम परवानगी दिल्याचे चौकशीत समोर आले आहे. समितीचे महापालिकेत सादर केलेल्या नकाशाची पडताळणी वसई भूमी अभिलेख कार्यालयाकडून केली असता नकाशा बोगस असल्याचे उजेडात आले होते. तसेच भूमी अभिलेख कार्यालयातील नकाशा आणि महापालिकेत सादर करण्यात आलेला नकाशा वेगळा असल्याचेही आढळून आले होते. हाअहवाल आल्यानंतर महापालिकेच्या नगररचना विभागाने दिलेली बांधकाम परवानगी रद्द केली आहे.

याप्रकरणी भूमी अभिलेख उपअधिक्षकांनी नकाशातील बदलाची चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. महापालिकेच्या नगर रचना उपसंचालकांनी संबंधितावर योग्य ती कारवाई करावी. वास्तुविशारद व विकासकाविरुद्ध कलम ३१६ (१), ३३६ (१), ३३५ (२), ३३८ अंतर्गत फोजदारी गुन्हा दाखल करावा. दोघांचाही परवाना तात्काळ रद्द किंवा निलंबित करावा. बांधकाम थांबवून स्थळ सील करावे. नोंदणी विभागाला लेखी सूचना देऊन दस्तनोंदणी थांबवावी. नगर रचना विभागातील दोषींवर प्रशासकीय व शिस्तभंगात्मक कारवाई करावी. स्वतंत्र आणि पारदर्शक चौकशी समितीने प्रकरणाची तपासणी करावी, आदी मागण्या चंदू पाटील यांनी केल्या आहेत. दरम्यान, नालासोपारा परिसरातील ६० एकर शासकीय व खासगी जमिनीवर ४१ बेकायदेशीर इमारती उभारल्याप्रकरणी ईडीकडून उच्चस्तरीय चौकशी झाली आहे. त्याच निलंबित नगररचना उपसंचालक वाय. एस. रेड्डी यांनी (VP - ६११०) ही बांधकाम परवानगी दिल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. त्यामुळे सदर प्रकरणही ईडी, संबंधित तपास विभाग व आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्याचीही मागणी पाटील यांनी केली आहे.

नालासोपाऱ्यातील ४१ अनधिकृत बांधकामप्रकरणी ईडीकडून कारवाई केली जात आहे. याकारवाईत ईडीने वसई विरार महापालिकेचे तत्कालीन आयुक्त अनिलकुमार पवार आणि नगर रचना विभागाचे निलंबित उपसंचालक वाय. एस.रेड्डी यांच्यासह विकासक सीताराम गुप्ता आणि अरुण गुप्ता यांना अटक केली आहे. तर वसई विरार परिसरातील बिल्डर, आर्किटेक्ट, मध्यस्थ, महापालिकेतील नगररचना विभागात ठेका पध्दतीवर कार्यरत इंजिनियर, वकिल यांना ईडीने नोटीस बजावून त्यांचीही चौकशी सुरु केली आहे. यापार्श्वभूमीवर बोगस कागदपत्राचे आधारे बांधकाम परवानगीचे आणखी एक प्रकरण चव्हाट्यावर आले आहे.

# घरात लाखोंची लुटमार करून लावली आग; चार चोरटे गजाआड

**वसई, दि. ४ : प्रतिनिधी**

घरात कुणीच नसल्याची संधी साधत चोरट्यांनी गच्चीवरील दरवाजाचे कुलुप तोडून चोरट्यांनी घरात प्रवेश करत दागदागिने आणि रोख रक्कम मिळून २२ लाख रुपयांची लुटमार केली. त्यानंतर घरातच असलेल्या किराणा मालाच्या दुकानाला आग लावली. याआगीत दुकान आणि घरातील सामान जळाले. याप्रकरणी चार चोरट्यांना नायगाव पोलिसांनी अटक केली आहे. या चोरट्यांमध्ये एका तरुणाचाही समावेश आहे.

वसई पूर्वेकडील चंद्रपाडा येथे राहणारे हर्षद किशोर म्हात्रे गणपती उत्सवाच्या पूजेसाठी विरार येथे सासरवाडीला कुटुंबासहीत गेले होते. ती संधी साधून चोरटे त्यांच्या घराच्या गच्चीवरील दरवाजाचे कुलुप तोडून घरात घुसले होते. त्यानंतर घरातील दागदागिने आणि रोख रक्कम मिळून २१ लाख १२ हजारांचा ऐवज लुटून नेला होता. धक्कादायक बाब म्हणजे लुटमार केल्यानंतर चोरट्यांनी त्यांच्या घरातील किराणा मालाच्या दुकानात घुसून आग लावली. त्यामुळे दुकानातील सामानही जळाले.

याप्रकरणी म्हात्रे यांनी दिलेल्या तक्रारीवरून नायगाव पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल केला होता. याप्रकरणी तपास करत असलेल्या पोलिसांनी अवघ्या चोवीस तासात तीन चोरट्यांना अटक करून चोरीचा गुन्हा उजेडात आणला. अजय प्रवीणकुमार यादव (वय २० वर्षे, रा. नायगाव पूर्व), सोनु फैजान खान (वय २० वर्षे), दिपक संजय खरात (वय २१ वर्षे, रा. चंद्रपाडा, नायगाव) आणि फातिमा उर्फ सोनी मोहम्मद शेख (वय २५ वर्षे, रा. चंद्रपाडा, नायगाव) अशी अटक करण्यात आलेल्या चोरट्यांची नावे आहेत.

# बँकेला गंडा घालणारा नऊ वर्षांनी पोलिसांच्या जाळ्यात

## नकली सोने तारण ठेऊन 75 लाख 37 हजारांची फसवणुक

**भाईंदर, दि. ४ : प्रतिनिधी**

भाईंदरमधील कॅथलिक सिलियन बँकेच्या भाईंदर शाखेत नकली सोने गहाण ठेऊन बँकेला ७५ लाख ३७ हजार रुपयांना गंडा घालणाऱ्या टोळीतील फरार ठगाला गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या काशिमीरा पथकाने विरारमधील मनवेल पाडा परिसरातून अटक केली आहे. गोपाल राधेश्याम नाग उर्फ चौरसिया असे त्याचे नाव आहे.

गोपाल नाग याचा नालासोपारा येथील फायर ब्रिगेडजवळ गगन मार्बल नावाचे बिल्डींग मटेरियल सप्लायचे दुकान होते. १५ डिसेंबर २०१२ ते १४ जून २०१६ दरम्यान राधेश्याम नाग याच्यासह सहा जणांच्या टोळीने कॅथलिक सिलियन बँकेच्या भाईंदर पूर्वेकडील शाखेच्या मॅनेजरच्या मदतीने नकली सोने गहाण ठेऊन बँकेला ७५ लाख ३७ हजार रुपयांना गंडा घातला होता. याप्रकरणी भाईंदर पोलीस ठाण्यात २०१६ मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता. तेव्हापासून गोपाल नाग फरार झाला होता.

सध्या यागुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखा करत आहे. गुन्ह्याचे गांभिर्य लक्षात घेऊन यागुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे प्रकटीकरण शाखा काशिमीराचे पथक तपास करत होते. तपासात पोलिसांना गोपाल नाग नालासोपारा परिसरात गोपाल चौरसिया यानावाने रहात असल्याची माहिती मिळाली होती. त्यावरून पथकाने त्याचा माग काढण्यास सुरुवात केली असता तो विरार पूर्वेकडील मनवेलपाडा परिसरात पोलिसांच्या हाती लागला.

पोलीस आयुक्त निकेत कौशिक, अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे, उपायुक्त संदीप डोईफोडे, सहाय्यक पोलीस आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखा काशिमीरा पथकाचे प्रभारी पोलीस निरीक्षक सुशिलकुमार शिंदे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन सानप, पोलीस उपनिरीक्षक संदीप शिंदे, सहाय्यक फौजदार पुष्पेंद्र थापा, हवालदार मनोज चव्हाण, स्वप्निल मोहिले, धिरज मेंगाणे, सौरभ इंगळे यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

# महिलेची रुग्णवाहिकेतच प्रसुती

**पालघर, दि. ४ : प्रतिनिधी**

प्रसुतीसाठी सफाळे प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आलेल्या गर्भवती महिलेची प्रसुती दरम्यान गुंतागुंत असल्याने तिला पालघर येथील ग्रामीण रुग्णालयात १०८ रुग्णवाहिकेतून नेले जात असतानाच रुग्णवाहिकेतच प्रसुती करावी लागली.

विधी सांबरे (वय २५ वर्षे) यागरोदर महिलेला प्रसुतीसाठी १ सप्टेंबरच्या रात्री सफाळे प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले होते. मात्र, प्रसुती दरम्यान गुंतागुंत होण्याची शक्यता पाहून वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तिला पालघर येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर १०८ रुग्णवाहिकेला बोलावण्यात आले. मध्यरात्री तीन वाजताच्या सुमारास रुग्णवाहिकेतून नेले जात असताना तिला वाटेतच प्रसुती कळा जाणवू लागल्या. तेव्हा रुग्णवाहिकेत असलेल्या वैद्यकीय अधिकारी डॉ. रुकसाना शेख यांनी महिलेची सुखरुप प्रसुती केली. महिला आणि नवजात बाळ सुखरुप असून त्यांना पालघरच्या ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

दरम्यान, याघटनेनंतर १०८ रुग्णवाहिकेत प्रसुती होण्याचे प्रकार सुरु असल्याचे पुहा एकदा समोर



आले आहे. अनेक सरकारी रुग्णालय आणि प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकी अधिकारी प्रसुतीच्या प्रकरणात गर्भवती महिलांना पुढील उपचाराच्या नावाखाली दुसऱ्या रुग्णालयात पाठवताना दिसतात. पालघर जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना आरोग्यमंत्री प्रकाश अबिटकर यांच्या निदर्शनास ही बाब आली होती. त्यावेळी त्यांनी पुढील उपचारासाठी दुसऱ्या रुग्णालयात नेण्याच्या सल्ला देणाऱ्या संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश आरोग्यमंत्र्यांनी त्यावेळी दिले होते. त्यानंतरही असे प्रकार सुरुच असल्याने जिल्हा प्रशासनाकडून आरोग्यमंत्र्यांचेच आदेश धुडकावले जात असल्याचे दिसून येत आहे.

# मनोरच्या शाळेत चोरीचा प्रयत्न

## सीसीटीव्हीने उघड केली चोरट्यांची कृत्ये

**मनोर, दि. ४ : प्रतिनिधी**

मनोरच्या नवी बस्ती परिसरातील अली अल्लाना इंग्लिश हायस्कूलमध्ये बुधवारी पहाटे अडीच वाजताच्या सुमारास घरफोडीचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. अज्ञात चोरट्यांनी शाळा व्यवस्थापन कार्यालयाच्या दरवाज्याचे कुलूप फोडून आत प्रवेश केला. मात्र त्यांच्या हालचाली शाळेत बसवण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात स्पष्टपणे कैद झाल्या असून, या प्रकरणी मनोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शाळा व्यवस्थापन कार्यालयात शिरलेल्या चोरांनी लाकडी टेबलाचा खण तोडून त्यातील साहित्य चोरण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांना यश आले नाही. घटनेची माहिती सुरक्षा रक्षकांनी पोलिसांना दिली असून, तपासासाठी पोलिसांनी घटनास्थळाला भेट दिली आहे. चोरट्यांनी गुन्ह्यावेळी रेनकोट व हाफ



चड्डी परिधान केलेली असल्याची माहिती सुरक्षा रक्षकांनी दिली आहे.

शाळेतील सीसीटीव्ही फुटेजमध्ये चोरट्यांचा प्रत्येक हालचाल कैद झाल्यामुळे पोलिस तपासाला मदत होईल. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी अज्ञात आरोपीविरोधात भारतीय दंड संहितेच्या कलम ३८० (चोरी), ४५७ (घरफोडी) व ५११ (गुन्ह्याचा प्रयत्न) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मनोर पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून, आरोपींचा शोध घेण्याचे

# "आम्ही साक्षर होणार" या पथनाट्यातून जनजागृती

**वाडा, दि. ४ : प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील गणेशोत्सवाच्या काळात उल्लास नवभारत साक्षरता अभियानाअंतर्गत जनजागृतीसाठी आम्ही साक्षर होणार हे पथनाट्य अष्टविनायक मंडळ खंडेश्वरी नाका येथे पंचायत समिती वाडा यांच्या सूचनेनुसार सादर करण्यात आले. तसेच वाडा तालुक्यातील विविध ठिकाणी या पथनाट्याचे सादरीकरण होणार आहे. या पथनाट्यात उमेश खिराडे , दिपक शनवारे , महेंद्र शनवारे,उर्मिला खिराडे , साधना भानुशाली ,ज्योती डोहाळे, दिव्या पाटील यादी शिक्षक कलाकारांच्या प्रमुख भुमिका आहेत. उल्लास नवभारत साक्षरता अभियान ही भारत सरकारची साक्षरता वाढवण्यासाठी सुरू केलेली महत्वाकांक्षी योजना आहे. या अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे देशातील प्रत्येक प्रौढ व्यक्तीला साक्षर करून त्यांना जीवनमान सुधारण्यासाठी आवश्यक ज्ञान, कौशल्ये व जागरूकता प्रदान करणे असे आहे. उल्लास नवभारत साक्षरता अभियानाची मुख्य उद्दिष्ट प्रौढ साक्षरता वाढवणे, १५ वर्षे व त्यावरील निरक्षर व्यक्तींना लेखन व वाचन, तंत्रज्ञानाचा वापर, आरोग्य, पोषण, आर्थिक व्यवहार आदी संदर्भात साक्षरता वाढवणे. मोबाईल, इंटरनेट, ऑनलाइन व्यवहार, डिजिटल पेमेंट्स यांसारख्या आधुनिक साधनांचा वापर शिकवून डिजिटल जगात सहभागी होण्यास सक्षम बनवणे तसेच प्रगत व सशक्त भारत घडवण्याचा पाया घातला आहे, असा संदेश या पथनाट्यतून देण्यात आला आहे.

# शाळांचा सर्व व्यवहार मराठीतच व्हावा; काँग्रेसची आग्रही मागणी

**ठाणे, दि. ४ : प्रतिनिधी**

ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागाने अलीकडेच सर्व शाळांना मराठी नामफलक लावणे सक्तीचे केले आहे. शासनाच्या २०१४ च्या निर्णयाची आठवण करून देत आता मनपाने काटेकोर अंमलबजावणीस सुरुवात केली आहे. ही नक्कीच आनंदाची बाब आहे. परंतु, केवळ फलक मराठीत असले तरी मराठीला न्याय मिळणार नाही, अशी भूमिका ठाणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीने घेतली आहे.

मराठी ही राज्यभाषा असून ती केवळ फलकांपुरती मर्यादित ठेवता येणार नाही. शाळांतील दैनंदिन कामकाज, पत्रव्यवहार, नोंदी, अर्ज, आदेश, हजेरी, हिशेब या सगळ्याचा व्यवहार मराठीतच व्हायला पाहिजे, अशी मागणी करणार असल्याचे सांगितले अन्यथा मराठी फलक हा केवळ दिखावा ठरेल, असे काँग्रेसचे शहराध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी सांगितले. यासंदर्भात काँग्रेस प्रशासनाकडे पाठपुरावा करून अधिकृत नोंदी व कागदपत्रे इंग्रजी किंवा हिंदीऐवजी मराठीतच ठेवण्याचा ठोस आग्रह धरणार आहे. "मराठी माणसाच्या मुलांच्या शाळेत जर व्यवहार इंग्रजीत होत असतील, तर नामफलक मराठीत असून काय साध्य होणार? खरा सन्मान तेव्हाच होईल, जेव्हा शाळांचे रोजनिशीपासून निकालपत्रापर्यंत सर्व कागदपत्रे मराठीत मिळतील," असे चव्हाण यांनी ठणकावून सांगितले.

मनपा शिक्षण विभागाने शाळांना आठ दिवसांच्या आत मराठी नामफलक लावण्याचे आदेश दिले असले, तरी काँग्रेसच्या या मागणीमुळे राजकीय वर्तुळात नवे समीकरण तापले आहे. भाजप-शिवसेना शासकीय स्तरावर मराठी फलकांवरच भर देत असताना, काँग्रेसने आता मराठी भाषेच्या दैनंदिन वापराचा मुद्दा पुढे आणत सरकारला अडचणीत टाकले आहे.

मराठी भाषेच्या रक्षणासाठी सतत लढा देणाऱ्या संघटनांनीही या मागणीचे स्वागत केले आहे. "शासनाचे आदेश फलकापुरते मर्यादित ठेवले, तर मराठीची दैनंदिन उपेक्षा थांबणार नाही. नामफलकांबरोबरच प्रशासनिक कागदपत्रेही मराठीत आली, तरच मुलांना खरी भाषा शिकायला मिळेल," असे स्थानिक मराठीवादी संघटनांनी मत व्यक्त केले.

ठाणेतील अनेक पालकांनीही यावर सकारात्मक प्रतिक्रिया दिली. "मुले शाळेत शिकतात ती भाषा आणि शाळेच्या ऑफिसात होणारा व्यवहार या दोन्ही मराठीतच असावेत. मुलांना मातृभाषेचे बळ तेव्हाच मिळेल," असे एका पालकाचे म्हणणे आहे. आता लक्ष ठाणे मनपा शिक्षण विभागाच्या पुढील निर्णयाकडे लागले आहे. केवळ फलकांपुरते आदेश राहतील, की काँग्रेसच्या मागणीमुळे दैनंदिन शालेय पत्रव्यवहारही मराठीत करण्याची अंमलबजावणी होईल, याकडे सर्वांचे डोळे लागले आहेत.

# रोजंदारी कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडवा

## आमदार विनोद निकोले यांची मागणी

**डहाणू, दि. ४ : प्रतिनिधी**

आदिवासी विकास विभागातील वर्ग ३ व वर्ग ४ रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी आमदार विनोद निकोले यांनी केली आहे. यासाठी त्यांनी पालघर जिल्हाधिकारी डॉ. इंदू राणी जाखड यांची जिल्हाधिकारी कार्यालयात भेट घेऊन चर्चा केली. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, डहाणू प्रकल्प अधिकारी विशाल खत्री तसेच मोठ्या संख्येने आदिवासी रोजंदारी कर्मचारी उपस्थित होते. गेल्या साठ दिवसांपासून आदिवासी विकास विभागातील वर्ग ३ व ४ रोजंदारी कर्मचारी नाशिक येथील आदिवासी आयुक्त कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करत आहेत. मात्र, दीर्घकाळ सुरू असलेल्या या आंदोलनानंतरही प्रशासन त्यांच्या न्याय्य मागण्यांकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. याबाबत निषेध व्यक्त करताना आंदोलनकर्त्यांनी राज्याचे आदिवासी विकास मंत्री असंवेदनशील वक्तव्य करीत असल्याची टीका केली आहे. या लढ्याला अधिक बळ मिळावे यासाठी मागील आठवड्यात आंदोलनकर्त्यांनी डहाणू येथील मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यालयाला भेट दिली होती. त्यावेळी लढ्याला अधिक तीव्र करण्यासाठी सहकार्याची मागणी करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांसोबत झालेल्या चर्चेत आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट इशारा दिल्या. त्यांच्या न्याय्य मागण्या मान्य न करता नवीन भरती प्रक्रिया राबवण्यात आल्यास ती तीव्र आंदोलनातून रोखण्यात येईल, असा इशारा यावेळी आमदार विनोद निकोले यांनी दिला आहे. जुन्या रोजंदारी कर्मचाऱ्यांना प्राधान्य न देता अन्यायकारक पद्धतीने भरती करण्याचा प्रयत्न झाल्यास आदिवासी समाज रस्त्यावर उतरून सरकारला धडा शिकवेल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

**MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION**

Indira Gandhi Bhavan, Chatrapati Shivaji Maharaj Marg,
Bhaindar (W), 401 101 Tal Dist-Thane
Vehicle Department

**MBMC/Vehicle/05/2025-26 Date:04/09/2025**

**// TENDER NOTICE NO. 05//**

Mira Bhayandar Municipal Corporation is inviting sealed rate e-tendering form for the following works in MBMC area. Blank tender form and other relevant documents will be available for download on MBMC e-tendering website of the Corporation at http://mahatenders.gov.in from 08/09/2025 to 15/09/2025 till 12.00 pm. The tender holder should pay the tender form fee and EMD amount through online receipt system. Otherwise the tender will not be considered valid.

The sealed tender called for this work is dated on 17/09/2025 in the afternoon and will be accepted on the above website till 12.00 pm. It will be opened on 19/09/2025 at 12.30 pm in the presence / absence of the contractors. Tender documents should not be send through Post or courier which will not be acceptable or valid. The final authority to accept any online tender or reject all tenders without giving any reason is reserved by the Hon.Commissioner of Mira Bhayandar Municipal Corporation.

| Sr. no | Name of Work | Earnest Money Deposit (EMD) (In Rs.) | Tender form fee | Period of Completion |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | Supply of private vehicle with driver including fuel on contract basis for mira bhayandar municipal corporation | 3,50,000 | 3000/- (GST 18%) =540 3540/- | 24month |

**Ref.No.MBMC/PRO/E-6668786/2025-26**
**Dt. 4/9/2025**

**Deputy Commissioner (vehicle dept)**
**Mira Bhayander Municipal Corporation**

**मुरबाड नगरपंचायत, मुरबाड**

ता. मुरबाड, जिल्हा. ठाणे-४२१ ४०१
Email id. mnpmurbad@gmail.comPh.No.02524225905

जा.क्र./मुनप/विद्युत/ई-निविदा/१२८४/२०२५-२६ दि-०३/०९/२०२५

**ई-निविदा सूचना क्र. १८, सन २०२५-२६**

मुरबाड नगरपंचायत, मुरबाड, ता. मुरबाड, जि.ठाणे विद्युत विभाग यांकडून "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तर)" सन २०२४-२५ या योजनेअंतर्गत ०४ कामाची निविदा मागविण्यात येत आहे. कामासंबंधी सविस्तर तपशील http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. निविदेचे सादरीकरण ऑनलाईन दि. ०५/०९/२०२५ ते दि. १२/०९/२०२५ कालावधीत करावयाचे आहे. तरी सदर निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.

सही/-
(मनोज म्हसे)
मुख्याधिकारी
मुरबाड नगरपंचायत, मुरबाड

# श्रध्दा, उत्साह आणि पर्यावरणाची जबाबदारी!

गणपती बाप्पा मोरया...
पुढच्या वर्षी लवकर या...
गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि धार्मिक जीवनाचा आत्मा आहे. दहा दिवस भक्तिभावाने घरोघरी आणि सार्वजनिक मंडळांत विराजमान झालेल्या गणरायाचा निरोप म्हणजेच गणेश विसर्जन. गणपती बाप्पा मोरया, पुन्हा वर्षी लवकर या... या गजरात नाचत-गात, ढोल-ताशांच्या तालावर, फुलांच्या वर्षावात गणेशाच्या मूर्तीचे विसर्जन केले जाते. परंतु या जल्लोषामागे काही गंभीर प्रश्न दडलेले आहेत, जे आपण विसरतो. गणेश विसर्जन म्हणजे केवळ धार्मिक विधी नाही. मातीपासून तयार झालेली मूर्ती जलात विसर्जित करणे म्हणजेच गणेश पुन्हा पंचतत्त्वात विलीन होणे, जीवन आणि मृत्यूच्या शाश्वत सत्याचा स्वीकार करणे होय. त्यामुळे हा विधी आत्मचिंतन व अध्यात्माचा संदेश देणारा आहे.

------------

गणेश चतुर्थी ते अनंत चतुर्दशीपर्यंत गणेशोत्सव साजरा केला जात असतो. गणेश चतुर्थीपासून गणपती बाप्पा संपूर्ण देशभर आपल्या भक्तांच्या घराघरात विराजमान होतात. गणेशोत्सव सुरू झाल्यानंतर दहाव्या दिवशी संपतो, जेव्हा मूर्ती सार्वजनिक मिरवणुकीत संगीत आणि सामूहिक मंत्रोच्चारात नेली जाते, त्यानंतर नदी किंवा समुद्रासारख्या जवळच्या पाण्यात विसर्जित केली जाते, ज्याला विसर्जन म्हणतात.

गणेश विसर्जनाच्या वेळी मंत्रोच्चार केल्याने गणपती बाप्पा प्रसन्न होतो आणि भक्तांवर आशीवार्दाचा वर्षाव करतो आणि त्यांना जीवनात सुख, समृद्धी आणि आनंद देतो. घरांमध्ये आणि सार्वजनिक पंडालमध्ये गणेशमूर्ती स्थापित करणे आणि त्यानंतरचे विसर्जन हे विश्वातील निर्मिती आणि विघटन चक्राचे प्रतीक आहे.

विसर्जन मिरवणुका समाजातील ऐक्याचे द्योतक आहेत. वेगवेगळ्या समाजघटकांतील, पिढ्यांतील, वर्गांतील लोक एकत्र येतात. उत्साह, गजर, नृत्य, फुलांचा वर्षाव यातून सामूहिक आनंद प्रकट होतो. परंतु हाच उत्साह कधी कधी बेभान होतो आणि ध्वनीप्रदूषण, वाहतूककोंडी, अपघात अशा समस्याही वाढतात.

सर्वात गंभीर बाब म्हणजे विसर्जनामुळे होणारे जलप्रदूषण. प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती, रासायनिक रंग, प्लॅस्टिकच्या सजावटी या थेट नद्या, तलाव, समुद्राचे पाणी दूषित करतात. जलीय प्राण्यांचा मृत्यू होतो, पिण्याच्या पाण्यावरही परिणाम होतो.

विसर्जनानंतर तलावांच्या काठावर विखुरलेले कचरे, फुलांच्या माळा, न वापरलेली सजावट हे शहराचे कुरूप चित्र दाखवतात. उत्सवाचा आनंद घेणे प्रत्येकाचे हक्क आहे. पण या आनंदासोबत निसर्गाची काळजी घेणे ही आपली जबाबदारी आहे.

मातीच्या मूर्तींचा वापर, नैसर्गिक रंग, कृत्रिम तलावांत विसर्जन, प्लॅस्टिक टाळणे हे उपाय आपण स्वीकारले पाहिजेत. अनेक शहरांमध्ये घ्घरगुती विसर्जन तलावह्न ही संकल्पना लोकांनी हळूहळू आत्मसात केली आहे, ही सकारात्मक बाब आहे.

बऱ्याच लोकांना वाटते की, गणेशाची प्राण प्रतिष्ठापना फक्त चतुर्थीलाच होते, तर तसे नाही. काही ठिकाणी प्रतिप्रदेला गणरायाची प्राण प्रतिष्ठापना केली जाते. प्रतिपदेपासून दशमीपर्यंत असे १० दिवस हा उत्सव साजरा केला जातो. काही ठिकाणी गणेश चतुर्थीपासून अनंत चतुर्दशीपर्यंत असे १० दिवस गणेशोत्सव साजरा होतो.

गणपतीची प्राण प्रतिष्ठापना केल्यानंतर त्याची पूजा करून विसर्जन करण्याचे हे व्रत एक किंवा दीड दिवसाचे आहे. पण उत्सवात आणखी रंगत आणण्यासाठी किंवा कित्येक जण नवस पूर्ण करण्यासाठी पाच दिवस, सात दिवसांनी गणेशमूर्तीचे विसर्जन करतात. त्यामागे कोणतेही शास्त्रीय कारण नाही.

गणेशभक्त आपल्या हौसेनुसार गणेशमूर्तीचे विसर्जन दीड, दोन, पाचव्या किंवा सातव्या किंवा दहाव्या दिवशी



करतात. हे दिवस आनंदात-उत्साहात गेल्यानंतर गणपती बाप्पाला निरोप देण्याची वेळ येते आणि नियमानुसार प्रथेनुसार गणेशाचे विसर्जन करण्याची प्रथा आहे.

गणपती विसर्जनाशी निगडीत अनेक गोष्टी आहेत. त्यापैकी एक म्हणजेच गणपतीला जल तत्वांचा अधिपती मानलं जातं.



प्रविण बागडे
नागपूर.
9923620919

त्यांच्या विसर्जनाचं मुख्य कारण तर हेच आहे की, अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणपतीची पूजा-अर्चा करून त्यांना पुन्हा पाण्यात विसर्जित केलं जातं. म्हणजेच ते ज्याचे अधिपती आहेत तिथे त्यांना पोहोचवलं जातं.

निसर्गाच्या प्रत्येकच गोष्टीचे एक चक्र आहे, ज्या गोष्टीची सुरुवात होते तिचा शेवट हा नक्कीच होतो. निसर्गाचा हा कालचक्राचा नियम गणेश विसर्जनातून दिसून येतो. निसर्गाच्या अंशापासून गणपतीची मूर्ती तयार होते आणि शेवटी निसर्गतःच ती विलीन होते. गणेश विसर्जनाच्या वेळेस विसर्जन हे फक्त मूर्तीचेच करायचे नसते तर आपल्यातील दुगुर्णांचे सुद्धा करायचे असते.

अनंत चतुर्दशीचा दिवस, एकट्या मुंबईत वर्षाला सुमारे दीड लाख मूर्तींचे विसर्जन केले जाते. गणपती विसर्जन पाण्यातच कां केले जाते, या विधी मागे सुध्दा काही धार्मिक कारणे आहेत. तसेच हिंदू धर्मात अनेक विधी हे निसगार्शी निगडीत आहे.

निसर्गाशी एकरूपता राखण्याचा संदेश वेगवेगळ्या पद्धतीने कायमच दिला जातो, गणपती विसर्जनांच्या बाबतीतही असेच आहे. ज्यावेळी महर्षी व्यास महाभारताची निर्मिती करत होते, त्यावेळी गणपती बाप्पा लेखनिकाची भूमिका बजावत होते. महाभारत लिहिण्याचे काम हे दहा दिवस अविरतपणे चालू होते. त्यामुळे गणपती बाप्पांनी शरीर गरम न व्हावे म्हणून अंगाला माती लिंपल्याचे उल्लेख आहे. हा गणपती बाप्पांचा विशेष अवतार असल्यामुळे त्यांना दहा दिवसानंतर जलसमाधी देतात अशी वंदता आहे.

कदाचित या दहा दिवसात बाप्पाची ऊर्जा टिकून राहावी म्हणून नैवैद्यासाठी गोडधोड, मोदक वगैरे करण्याची परंपरा आहे. अहोरात्र लिहिण्याच्या कामामुळे शरीर उष्ण झाल्यामुळे पाण्यात डुबकी मारल्याविना गत्यंतर नव्हती असेही अख्यायिका आहे. त्यामुळे गणपतीचे विसर्जन अनंत चतुर्दशीच्या दिवशी करतात.

गणेश विसर्जन हा आपल्या संस्कृतीतील श्रद्धा, भक्ती आणि एकात्मतेचा उत्सव आहे. मात्र तो पर्यावरणाच्या हानीचा कारणीभूत ठरू नये. बाप्पा पुन्हा वर्षी लवकर या...असे गजर करताना आपण त्याला प्रदूषित नद्या, रासायनिक कचऱ्याचा डोंगर दाखवला तर ती खरी भक्ती ठरेल का? आता वेळ आली आहे की श्रद्धा आणि जबाबदारी यांचा समतोल राखावा. गणेशोत्सव पर्यावरणपूरक झाला तरच आपले मोरया खऱ्या अर्थाने गजर ठरेल.

# शिक्षक दिन!



आज ५ सप्टेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा आज जन्मदिवस. त्यांच्याच स्मरणार्थ आजचा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो.

१९६२ मध्ये राधाकृष्णन यांनी राष्ट्रपती पदाची शपथ घेतली तेव्हा त्यांनी त्यांचा जन्मदिवस हा शिक्षकांचा गौरव दिवस म्हणून साजरा करण्याची इच्छा प्रकट केली होती. देशातील शिक्षकांचा गौरव हाच आपला गौरव असल्याची त्यांनी सांगितले होते. तेव्हापासून सुरू झालेली ही परंपरा अजूनही सुरूच असून भविष्यातही सुरूच राहील.

आपल्या संस्कृतीत शिक्षकाला म्हणजे गुरूला मानाचे स्थान आहे. प्रत्येक व्यक्तीच्या जडणघडणीत गुरूंची म्हणजे शिक्षकांची भूमिका खूप महत्वाची असते. शिक्षक हा केवळ मार्गदर्शक नसतो तर तो जीवनाला दिशा दाखवणारा दिशादर्शक असतो. भारतीय शिक्षण परंपरेत गुरू शिष्यांचा संबंध अत्यंत पवित्र मानला आहे. प्राचीन काळी गुरुकुल पध्दत होती. विद्यार्जन करण्यासाठी विद्यार्थी घरदार सोडून गुरूच्या घरी राहण्यास येत असे. गुरू हा त्या शिष्यांच्या मातापित्यांची जागा घेत असे. शिष्याला केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे तर शिष्याला चारित्र्यसंपन्न करणे हे कर्तव्य आहे या विचारप्रेरणेतून गुरू विद्यादान करत असे.

शिष्याच्या जीवनात गुरुला सर्वोच्च स्थान असत आणि गुरूच्या जीवनातही शिष्याला सर्वोच्च प्राधान्य असे. याप्रमाणे त्याकाळी गुरु शिष्य संबंध पवित्र बंधनाने युक्त होते. आज काळ बदलला असला तरी शिक्षकांचे महत्व कमी झाले नाही.

आजच्या विज्ञान युगातही पूर्वीप्रमाणेच शिक्षकांची आवश्यकता भासते. मनुष्याच्या जीवनातून शिक्षक वजा होऊच शकत नाही. जर शिक्षकच नसेल तर मनुष्याच्या जीवनाची दिशा भरकटू शकते. मनुष्याचे जीवन भरकटलेल्या नौकेसारखे होईल म्हणूनच शिक्षक दिनाचे औचित्य साधून शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त केली जाते. केवळ आपल्याच देशात नव्हे तर ऑस्ट्रेलिया, कॅनडा, ब्राझील, जर्मनी, जपान, इंडोनेशिया, मलेशिया, चिली या देशातही शिक्षक दिन साजरा केला जातो. मात्र तिथे हा दिवस ५ ऑक्टोबरला साजरा केला जातो.

आपल्या देशात हा दिवस ५ सप्टेंबरला साजरा केला जातो. कारण याच दिवशी १८८८ साली भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म तामिळनाडूतील तिरुथानी या गावी एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. अतिशय हुशार व कुशाग्र बुद्धीचे असल्याने त्यांनी शिक्षण क्षेत्रात स्वतःचे वेगळे वलय निर्माण केले. आंध्र विद्यापीठ आणि बनारस विश्व विद्यापीठाचे कुलगुरुपद त्यांनी भूषवले. १९३१ ते १९३९ या काळात ते संयुक्त राष्ट्रसंघात भारताचे प्रतिनिधी होते.

१९४९ ते १९५२ पर्यंत ते रशियामधील भारताचे राजदूत होते. १९५२ साली ते भारताचे पहिले उपराष्ट्रपती बनले. या पदावर दहा वर्ष राहिल्यानंतर १९६२ साली ते भारताचे दुसरे राष्ट्रपती बनले. १९५४ साली त्यांना भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने गौरविण्यात आले. शुद्ध चारित्र्य, प्रकांड पांडित्य, अपार सहिष्णुता आणि प्रभावी वक्तृत्व यामुळे डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी जगभर विलक्षण लोकप्रियता मिळवली म्हणूनच नोबेल पुरस्कारासाठी त्यांना तब्बल २७ वेळा नामांकन मिळाले.

शिक्षक ते राष्ट्रपती ही त्यांची वाटचाल त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष आहे. त्यांच्या याच कर्तृत्वाचा सन्मान म्हणून सरकारने १९६२ पासून त्यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करायला सुरवात केली. आजच्या या शिक्षक दिनी देशभरातील शिक्षक बंधू भगिनींना शिक्षक दिनाच्या मनापासून शुभेच्छा!



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

# कर्तृत्ववान व आदर्श शिक्षक

आपल्या भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस म्हणजेच ५ सप्टेंबर हा दिवस शिक्षक दिन म्हणून संपूर्ण भारतात साजरा केला जातो. डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान दिल्यामुळे त्यांच्या सन्मानार्थ हा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो.

या दिवशी प्रत्येक शाळेतील व महाविद्यालयातील विद्यार्थी आपल्या शिक्षकांना मनःपूर्वक वंदन करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व आदर व्यक्त करतात आणि त्यांना शिक्षक दिनाच्या खूप खूप शुभेच्छा देतात. तसेच शाळेत व महाविद्यालयात विद्यार्थ्यांना जीव ओतून आणि तळमळीने शिकवणाऱ्या कर्तृत्ववान व आदर्श शिक्षकांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना शिक्षक दिनानिमित्त विविध पुरस्कार देऊन प्रशासन व विविध सामाजिक संघटना त्यांचा सन्मान करते.

परंतु आजकाल खऱ्या शिक्षकांच्या कार्याची दखल न घेता, जो शिक्षक राजकारणी लोकांच्या जवळचा आहे किंवा संबंधातील आहे? अशाच शिक्षकांना पुरस्कार दिला जात आहे. मग तो शिक्षक व्यसनी असो, कामचुकार असो किंवा टंगळमंगळ करणारा असो, त्यांना पुरस्कार दिला जात आहे.

जो शिक्षक पुरस्काराच्या लायकीचा आहे आणि विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी तळमळीने शिकवणारा आहे, अशा लायक व पात्र शिक्षकांना डावलून व्यसनी, कामचुकार व टंगळमंगळ करणाऱ्या राजकारणी शिक्षकांना पुरस्कार देऊन सन्मानित केले जात आहे. यामुळे शिक्षण क्षेत्राला कलंक लागत आहे. शिक्षण क्षेत्राकडे बघण्याचा लोकांचा दृष्टिकोन बदलून गेला आहे.

शिक्षण क्षेत्रातील पावित्र्य डागाळत आहे. पण जे शिक्षक खरोखर आदर्श व कर्तृत्ववान आहेत, विद्यार्थ्यांच्या भल्यासाठी व त्यांचे भवितव्य घडवण्यासाठी जीव ओतून व तळमळीने शिकवतात, अशा शिक्षकांना खरेतर पुरस्काराची हाव नसते, विद्यार्थी घडवणे आणि त्यांना चांगला नागरिक बनवणे, हाच त्यांचा खरा पुरस्कार असतो. अशा कर्तृत्ववान व आदर्श शिक्षकांना मनःपूर्वक सलाम करावा वाटतो.

माझे शिक्षक व गुरुवर्य बबनराव गुळवे गुरुजी हे माज्या गावातील जिल्हा परिषद प्रशाला खंडाळी शाळेत एक आदर्श व कर्तृत्ववान शिक्षक तथा मुख्याध्यापक म्हणून शिक्षकी पेशाला खरा न्याय देत आहेत. शाळेत वेळेवर येणे, वर्गात वेळेवर जाणे, जादा तासिका घेऊन शिकवणे, विद्यार्थ्यांना शैक्षणिक अभ्यासाबरोबरच संस्काराचे धडे देणे आणि परिपाठाच्या वेळी विद्यार्थ्यांना बोधकथा सांगणे, हे गुळवे सर निस्वार्थ भावनेने, कोणत्याच पुरस्काराची किंवा सन्मानाची अपेक्षा न ठेवता तळमळीने व तन-मन-धनाने आपले कार्य करतच राहतात.

अशा शिक्षकांची प्रत्येक शाळेला नितांत गरज आहे. परंतु दुर्दैवाने आजकाल असे शिक्षक शाळेला लाभणे दुर्मिळ झाले आहे. अशा शिक्षकांची संख्या वाढणे काळाची गरज आहे. त्यासाठी प्रत्येक शिक्षकांनी स्वतःचे आत्मपरीक्षण करून शिक्षकी पेशाला खरा न्याय देण्याचे काम प्रामाणिकपणे करावे आणि शिक्षण क्षेत्राला लागलेला कलंक पुसून काढावा. कारण ही सध्या काळाची गरज आहे.

गुळवे सर सुप्रसिद्ध गणित शिक्षक तर आहेतच, परंतु ते एक सुप्रसिद्ध लेखक, कवी व वक्ते आहेत. शिक्षकी पेशा सांभाळत साहित्य क्षेत्रात मोलाचे योगदान देणे आणि लिखाणाच्या व वक्तृत्वाच्या माध्यमातून समाज परिवर्तन करणे ही साधी गोष्ट नाही.

दिवसभर शाळा करून संध्याकाळी लिखाण करणे हे खरोखरच खूप मोठे काम आहे. गुळवे सरांचे अनेक विद्यार्थी वेगवेगळ्या क्षेत्रात मोठमोठ्या पदावर कार्यरत आहेत. आजवर गुळवे सरांनी अनेक विद्यार्थ्यांचे भवितव्य घडवून त्यांच्या जीवनाचे सोने केले आहे. गुळवे सरांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य खरोखरच उल्लेखनीय आहे.



बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे
खंडाळी, ता.अहमदपूर
जि. लातूर
7498715661

आपल्या वर्तनातून व अध्यापनातून ते इतर सहकारी शिक्षकांवर आपल्या विलक्षण कार्याची जबरदस्त छाप पाडत असतात. माज्या खंडाळी गावातील जिल्हा परिषद शाळेत गुळवे सर गणित शिक्षक म्हणून जवळपास वीस वर्षे झाली आपली सेवा बजावत आहेत.

आमचे खंडाळीकर गुळवे सरांना आमच्या प्रशालेचे भूषण व वैभव समजतात. त्यांची होऊ लागलेली बदली आमच्या गावकऱ्यांनी अनेक वेळा एक होऊन थांबवली आहे. गुळवे सर हे एक शिक्षकी पेशातील आदर्श व कर्तृत्ववान शिक्षक आहेत. त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील योगदानामुळे त्यांचे विद्यार्थी दहावी बोर्ड परीक्षेत गणित विषयात शंभर पैकी १०० गुण घेऊन उत्तीर्ण होतात.

आमच्या जिल्हा परिषद शाळेतील गुळवे सर हे एक विद्यार्थी प्रिय शिक्षक आहेत, शाळेतील विद्यार्थी त्यांच्यावर जीव ओवाळून टाकायला सुद्धा मागेपुढे पाहत नाहीत. गुळवे सरांसारखे कर्तृत्ववान, गुणी, ज्ञानी व आदर्श शिक्षक आमच्या खंडाळी प्रशालेला लाभणे हे आमच्या खंडाळीकरांचे खरोखरच भाग्य आहे, असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.

शिक्षक दिनानिमित्त शिक्षण विभागाला एवढेच सांगावे वाटते की, पुरस्कार देताना शिक्षकांच्या कार्याची अगोदर पडताळणी करा...राजकारणी लोकांचे ऐकून अपात्र व नालायक शिक्षकांना पुरस्कार देऊन आदर्श व कर्तृत्ववान शिक्षकांच्या भावना दुखवू नका...शिक्षकांच्या कार्य व कर्तृत्वाचा आढावा घेऊनच त्यांची पुरस्कारासाठी निवड करा...उगाच कोणालाही पुरस्कार देऊन शिक्षण क्षेत्राला कलंकित करू नका...तरच शिक्षण क्षेत्राला चांगले दिवस येतील आणि लोकांचा बघण्याचा दृष्टिकोन सुद्धा निकोप असेल...आज शिक्षक दिनानिमित्त निरपेक्ष भावनेतून शिक्षकी पेशाला न्याय देणाऱ्या प्रामाणिक, कर्तृत्ववान व आदर्श शिक्षकांना कोटी कोटी वंदन...

माझ्या खंडाळी प्रशालेची आन-बान शान आणि आदर्श व कर्तृत्ववान शिक्षक तथा माझे मार्गदर्शक गुरु बबनराव गुळवे गुरुजी यांना शिक्षक दिनानिमित्त साष्टांग दंडवत आणि कोटी कोटी वंदन...



## !! मागणे !!

आज कृतार्थ भावाने
तुला जोडूनिया हात।
देवा, मागू का रे काही?
लावताना फुलवात।।

माझ्या दिठीत वसावे
तुझे मोहकसे बिंब।
तुज्या अथांग कृपेचा
एक गवसावा थेंब।।

माझा कण-कण देह
वंचितांच्या कामी यावा।
आणि मनाचा आरसा
सदा नितळ रहावा।।

सदा पांघराया मिळो
तुझ्या कृपेचा पदर।
देवा चैतन्यस्वरूपा
हाच एक द्यावा वर।।

■ वीणा डोंगरवार
नागपूर.

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात शिक्षकाची भूमिका किती प्रभावी

(राष्ट्रीय शिक्षक दिन विशेष ५ सप्टेंबर २०२५)
शिक्षकांना पालकांच्या बरोबरीचे मानले जाते. पालकांनंतर, मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक सर्वात जास्त जबाबदार असतात. असे म्हटले जाते की देशाच्या भावी पिढ्या प्रगती करतील की विनाश, या दोन्ही गोष्टी शिक्षकाच्या भूमिकेवर अवलंबून असतात. कारण, ज्ञानाधारित अध्यापनाद्वारे, शिक्षक विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमता ओळखून त्यांना सक्षमपणे सुधारतो. दुसरीकडे, जर एखादा शिक्षक त्याच्या भूमिका आणि पदाची प्रतिष्ठा विसरला तर त्याचे परिणाम संपूर्ण समाजाला दीर्घकाळ भोगावे लागतात.

------------------

शिक्षक हे गुणांची खाण असल्याचे म्हटले जाते, ज्यामध्ये विषय ज्ञान, संवाद कौशल्य, अध्यापनाची आवड, सकारात्मक दृष्टिकोन, सर्जनशील विचारसरणी, संशोधक, संयमी, चारित्र्यवान, सत्य, बुद्धिमान, मेहनती, सहनशील, मृदुभाषी, वेळेचे मूल्य जाणणारा, कोणत्याही भेदभावाशिवाय सर्व विद्यार्थ्यांकडे समानतेने पाहणारा, त्यांची कौशल्ये समजून घेणारा, विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी नेहमीच संघर्ष करणारा हे असे गुण शिक्षकात असतात. हे गुण खऱ्या शिक्षकाची ओळख आहे.

शिक्षक हे विद्यार्थ्यांसाठी आदर्श मार्गदर्शक, प्रेरणेचे स्त्रोत आणि मित्र असतात, जे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात सर्वात महत्त्वाची भूमिका बजावतात. विद्यार्थ्यांच्या नैतिक आणि चारित्र्य विकासात शिक्षकांचे मोलाचे योगदान असते. म्हणजेच, शिक्षक विद्यार्थ्यांना शिक्षित करतातच सोबत त्यांना चांगले जीवन जगण्यास सक्षम आणि त्यांना सुजान नागरिक बनवतात.

शिक्षणाचा खरा अर्थ केवळ पुस्तकी ज्ञान किंवा तांत्रिक कौशल्ये आत्मसात करणे असा नाही, तर ती एक अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक, नैतिक आणि आध्यात्मिक क्षमतांचा सर्वांगीण विकास होतो. ज्ञान आणि अनुभवाद्वारे एखाद्या व्यक्तीला बुद्धिमान, संवेदनशील आणि समाजासाठी उपयुक्त बनवणे हा त्याचा उद्देश आहे, जेणेकरून तो जीवनातील समस्या सोडवू शकेल आणि एक सुसंस्कृत नागरिक बनू शकेल.

एक काळ असा होता जेव्हा शिक्षण हे समाजसेवेचा एक भाग होते, तेव्हा समाजसुधारक शिक्षणाची ज्योत प्रज्वलित करण्यासाठी आणि समाजात एक नवीन क्रांती घडवून आणण्यासाठी संघर्ष करत असत, पण आजच्या व्यापारीकरणाच्या युगात शिक्षणाकडे व्यवसाय म्हणून पाहिले जाते.

देशातील उच्च सरकारी अधिकारी, नेते, कर्मचारी आणि स्वतः सरकारी शिक्षकही त्यांच्या मुलांना महागड्या खाजगी शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण देण्यास प्राधान्य देतात. कारण ते कदाचित सरकारी शिक्षण व्यवस्थेवर समाधानी नसतील आणि श्रीमंत कुटुंबातील मुले थेट परदेशात शिक्षण घेण्यास प्राधान्य देतात. दरमहा एक लाख ते दीड लाख रुपये पगार मिळवणारे सरकारी शिक्षकही त्यांच्या मुलांना खाजगी शाळांमध्ये शिकवतात, असे का घडते?



डॉ. प्रितम भी. गेडाम
८२३७४ १७०४१
prit00786@gmail.com

सरकारी शिक्षकांना त्यांच्या स्वतःच्या शिक्षण व्यवस्थेवर विश्वास नाही का? सर्वात पवित्र मानल्याजाणाऱ्या शिक्षक वर्गातही अनेक घृणास्पद घटना शिक्षण जगताला कलंकित करत आहेत, आजही देशातील ही परिस्थिती फारशी बदललेली नाही. सध्या महाराष्ट्र राज्यातही सरकारी शालार्थ आयडी घोटाळा चर्चेत आहे. शेकडो सरकारी अनुदानित शाळांमधील शिक्षकांचे खोटे आकडे दाखवून वर्षानुवर्षे पगाराच्या नावाखाली सरकारचे कोट्यवधी रुपये लुटले जाण्याच्ये धंधे सर्रास सुरु होते.

शिक्षणातही भ्रष्टाचार शिगेला पोहोचला आहे, त्याबद्दल सर्वांना माहिती आहे, पण त्याविरुद्ध कोणीही बोलू इच्छित नाही. महाराष्ट्र राज्यातील सरकारी अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये शिक्षक भरतीच्या नावाखाली भ्रष्टाचाराच्या बातम्या आपण अनेकदा पाहतो, ऐकतो आणि वाचतो.

ही भरती एका गठित समितीद्वारे केली जाते, विद्यापीठाच्या कुलगुरू आणि राज्य सरकारच्या मंत्र्यांकडे तक्रार करूनही, सुधारणेच्या नावाखाली फक्त आश्वासने ऐकू येतात. आतापर्यंत सरकारने या भरतींची पूर्ण जबाबदारी स्वतः कडे घेतलेली नाही. अशा व्यवस्थेत, पात्रता असूनही प्राध्यापक होण्याचे गरीब आणि प्रामाणिक लोकांचे स्वप्न संघर्ष आणि भ्रष्टाचारात दबले जाते.

देशातील काही आर्थिकदृष्ट्या सक्षम खाजगी शैक्षणिक संस्थांची स्थिती समाधानकारक आहे, परंतु बहुतेक खाजगी शैक्षणिक संस्थांमध्ये, कदाचित सर्वात शिक्षित शिक्षक सर्वात कमी पगारावर काम करतात.

अनेक खाजगी शाळा आणि महाविद्यालयांमध्ये शिक्षकांना रोजंदारी कामगारापेक्षा कमी वेतन मिळते. यासोबतच, एका पदावर काम करताना, त्यांना संस्थेची इतर कामे देखील करावी लागतात. या क्षेत्रातील बेरोजगारीचा दरही सर्वाधिक आहे. आजच्या महागाईच्या काळात, २५००-३००० रुपये दरमहा पगार काहीच महत्त्वाचा नाही. तरीही मोठ्या संख्येने शिक्षक या पगारावरही काम करत आहेत, ही आपल्यासाठी खूप लाजिरवाणी आणि दुःखाची बाब आहे.

------------------

(उर्वरीत भाग पुढील अंकी)

# दररोज सकाळी रिकाम्या पोटी सुके नारळ खाल्ल्याने शरीरात काय बदल होतात



नारळ असो किंवा मग नारळ पाणी आपल्यासाठी किती महत्त्वाचं असतं हे आपल्या सर्वांनाच माहित आहे. एवढंच नाही तर नारळ तेलही आपल्या ब्यूटी रेमीडीमध्ये आपण वापरतो.पण ते नारळ पाणी असो, नारळाचे तेल असो, नारळाचा गर असो किंवा सुका नारळ असो. अगदी त्याची पानेही अनेक गोष्टी बनवण्यासाठी वापरली जातात. अनेकांना हे माहित नसेल की, जर दररोज सकाळी रिकाम्या पोटी नारळ किंवा सुके नारळ खाल्ले तर त्याचा आरोग्यावर काय परिणाम होतो? काय फायदे मिळतात?

**रिकाम्या पोटी सुके नारळ खाण्याचे फायदे**

**ऊर्जा वाढवण्यासाठी उपयुक्त**

नारळामध्ये हेल्थी फॅट्स असतात. हे फॅट्स शरीराला ऊर्जा देण्याचं काम करतात. अशा परिस्थितीत, सकाळी रिकाम्या पोटी कोरडे म्हणजे सुका नारळ खाल्ल्याने शरीर दिवसभर ऊर्जावान राहते आणि थकवा कमी होतो. व्यायाम करणाऱ्या किंवा रोजच्या धावपळीच्या जीवनशैली जगणाऱ्या लोकांसाठी नारळ विशेषतः फायदेशीर आहे. त्यामुळे शरीराला आलेला थकवा जाणवत नाही.

**पचनासाठी फायदेशीर**

नारळामध्ये फायबर आणि नैसर्गिक प्रोबायोटिक्स असतात जे आतड्यांचे आरोग्य सुधारतात. अशा परिस्थितीत, दररोज सकाळी रिकाम्या पोटी नारळ खाल्ल्याने पचन सुधारते. यामुळे बद्धकोष्ठता, पोट फुगणे आणि अपचन यासारख्या समस्या कमी होऊ शकतात.

**रोगप्रतिकारशक्ती वाढवते**

नारळामध्ये लॉरिक ॲसिड असते जे शरीराला विषाणू, बॅक्टेरिया आणि संसगार्शी लढण्यास मदत करते. याशिवाय, त्यात पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि अँटीऑक्सिडंट्स असतात जे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते. नारळ नियमितपणे खाल्ल्याने सर्दी आणि खोकला सारख्या आजारांचा धोका कमी होतो.


**त्वचेसाठी नैसर्गिक मॉइश्चरायझर**

नारळातील निरोगी फॅट्स त्वचेला आतून हायड्रेट ठेवतात. यामुळे त्वचा मऊ आणि चमकदार राहते. नारळाचे तेल नैसर्गिक मॉइश्चरायझर म्हणून देखील काम करते आणि मुरुमे, कोरडेपणा आणि तेलकट त्वचेच्या समस्या कमी करते.

**रक्तातील साखर नियंत्रित ठेवते**

नारळाचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी असतो, त्यामुळे मधुमेहाच्या रुग्णांसाठी तो एक चांगला पर्याय आहे. त्यात असलेले इन्युलिन फायबर रक्तातील साखरेची पातळी स्थिर ठेवण्यास मदत करते. अशाप्रकारे, नारळ तुमच्यासाठी एक सुपरफूड म्हणून काम करू शकते. तसेच तुम्ही वर्षभर तुमच्या आहारात त्याचा समावेश करू शकता.

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### सामाजिक उत्सव संहिता

समाज हिताचे ठेवूनी भान
उपक्रम सर्वांनी राबवावे
पण आपल्या उपक्रमाचे
कोणतेही उपद्रव मुल्य नसावे!

वर्गणी असो की देणगी
स्वखुशीने स्विकारावे
टेंशन येईल दात्याला
असे कार्यकर्तांचे वर्तन नसावे..!

डीजेच्या स्फोटक आवाजाने
कान बधीर तर छाती धडधडते
हार्ट पेशंटच्या जिवालाच
धोका नाही का गडे?

लेजरच्या प्रखर किरणांनी
दृष्टीवर होतो दुष्परिणाम
मंडळांनो सदविचार करा
सामाजिक आरोग्याची
ठेवा जाण!

# जिल्ह्यातील आश्रम शाळांमध्ये गोवर-रुबेला लसीकरणासाठी टास्क फोर्स बैठक संपन्न

**रायगड, दि. ४ : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील सर्व आश्रम शाळांमध्ये गोवर-रुबेला लसीकरण मोहीम यशस्वीपणे राबविण्यासाठी जिल्हास्तरीय टास्क फोर्सची बैठक जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीस जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.निशिकांत पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.मनिषा विखे, माता बालसंगोपन अधिकार डॉ.नितीन बावडेकर, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रियका साळुंके, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी आत्माराम धाबे, शिक्षण विभागाचे अधिकारी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

दि.15 सप्टेंबर ते दि.30 सप्टेंबर 2025 या कालावधीमध्ये जिल्ह्यातील सर्व आश्रम शाळांमध्ये गोवर रूबेला प्रतिबंधात्मक लसीकरण मोहीम हाती घेण्यात येणार आहे या मोहिमेंतर्गत एकूण 26 आश्रम शाळा मधून 5 ते 15 वयोगटातील 9 हजार 214 विद्यार्थी लसीकरण मोहिमेमध्ये सहभागी होणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

गोबर हा अत्यंत संसर्गजन्य आजार असून त्यामध्ये ताप, अंगावर पुरळ, खोकला, डोळ्यांची लालसरता अशी लक्षणे दिसतात. वेळीच उपचार न मिळाल्यास न्यूमोनिया, अतिसार, मेंदूज्वर यांसारख्या गुलागुंती उद्भवू शकतात. त्याचप्रमाणे रुबेला हा संसर्गजन्य आजार विशेषतः गर्भवती महिलांसाठी धोकादायक आहे. गर्भारपणात संसर्ग झाल्यास नवजात बालकांमध्ये जन्मजात विकृती, हृदयविकार, बहिरेपणा किंवा डोळ्याचे दोष उद्भवू शकतात यावर एकमेव प्रभावी उपाय म्हणजे लसीकरण गोवर-रुबेला लस पूर्णपणे सुरक्षित असून ती मुलाना आजारांपासून संरक्षण देते. लसीकरणानतर विद्यार्थ्यांमध्ये प्रतिकारशक्ती वाढते तसेच समाजामध्ये रोगांचा प्रसार रोखता येतो.

बैठकीत लसीकरण मोहिमेच्या नियोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. जिल्हा प्रशासन, आरोग्य विभाग व शिक्षण विभाग, महिला व बालकल्याण विभाग तसेच आदिवासी विकास विभाग यांचे संयुक्त नियोजनातून ही मोहीम राबविण्यात येणार असून कोणताही विद्यार्थी लसीकरणापासून वंचित राहू नये, यावर विशेष भर देण्यात आला आहे.

मोहिमेत 5 वर्षे ते 15 वर्षे वयोगटातील सर्व मुलाचा समावेश होईल यासाठी आश्रम शाळांमध्ये लसीकरण पथके पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला एका दिवसात एका आश्रम शाळेचे संपूर्ण लसीकरण करावे. तसेच लसीकरण केल्यानंतर कुठल्याही प्रकारची गुंतागुंत होणार नाही याची दक्षता घ्यावी लासिकरणांसाठी पुरेशी लस उपलब्ध करून घ्यावी. लसीकरणानंतर स्वतंत्र खोली व लाभार्थीसाठी स्वतंत्र प्रतीक्षाकक्षाची व्यवस्था करावी मोहिमेबाबत शाळेकडून पालकाना सूचना देण्यात यावी. विद्यार्थ्यांच्या आरोग्य सुरक्षेसाठी शिक्षक व पालकांनी सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहन बैठकीत करण्यात आले.

# ऊर्जा परिवर्तनामुळे विद्युत क्षेत्रात महाराष्ट्र हे देशातील 'रोल मॉडेल'
## परराष्ट्र सेवेतील अधिकाऱ्यांकडून महाराष्ट्राचे कौतुक

**मुंबई, दि. ४ : प्रतिनिधी**




पारंपरिक कोळसा, नैसर्गिक वायू व तेलावर आधारित विजेऐवजी महाराष्ट्राने सौर ऊर्जेला अधिक प्राधान्य देत ऊर्जा परिवर्तनामध्ये देशात सर्वप्रथम आघाडी घेतली आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या विद्युत क्षेत्रात आमुलाग्र सुधारणा दिसून येत आहे. या ऊर्जा परिवर्तनासाठी देशाच्या विद्युत क्षेत्रात महाराष्ट्र हे रोल मॉडेल आहे, असे गौरवोद्गार भारतीय परराष्ट्र सेवेतील अधिकाऱ्यांनी गुरूवारी (दि. ४) काढले.

महाराष्ट्रातील विद्युत क्षेत्र व विविध सौर ऊर्जा योजनांची माहिती घेण्यासाठी भारतीय परराष्ट्र सेवेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मुंबई येथील महावितरण व महानिर्मितीच्या सांघिक कार्यालयास भेट दिली. यामध्ये योजना पटेल (न्यूयॉर्क), प्रतिभा पारकर राजाराम, पारमिता त्रिपाठी, अन्कन बॅनर्जी, सी. सुगंध राजाराम तसेच बिश्वदीप डे (टान्झानिया), स्मिता पंत (ताश्कंद) यांचा समावेश होता. यावेळी महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी. यांची प्रमुख उपस्थिती होती.

महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सांगितले की, मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात ऊर्जा विभागाने राज्यातील विजेची वाढती मागणी व पुरवठ्याच्या नियोजनासाठी रिसोर्स अॅडेक्वेसी प्लॅन तयार केला आहे. त्यानुसार सन २०३० पर्यंत तब्बल ३८ हजार मेगावॅट हरित ऊर्जेसह ४५ हजार मेगावॅट विजेची आणखी भर पडणार आहे. राज्यातील नवीकरणीय ऊर्जेची क्षमता १३ टक्क्यांवरून ५२ टक्के होणार आहे. यामध्ये सुमारे ३ लाख ३० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून सुमारे ७ लाख रोजगार निर्माण होणार आहेत. यासह पुढील पाच वर्षांमध्ये वीज खरेदीमध्ये ८२ हजार कोटी रुपयांची बचत होईल. त्यामुळे येत्या पाच वर्षात सर्वच वर्गवारीतील वीज दर कमी होत जाणार आहे. सोबतच हरित ऊर्जेला प्राधान्य दिल्यामुळे कार्बन डायऑक्साईडचे (सीओटू) उत्सर्जन कमी करण्याच्या उद्दिष्टाला बळ मिळेल.

लोकेश चंद्र म्हणाले, मुख्यमंत्री सौर कृषी योजना २.० अंतर्गत कृषिर्मिती योजना आहे. या योजनेमुळे राज्यात ६५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होत असून ग्रामीण भागात सुमारे ७० हजार रोजगार संधी उपलब्ध होत आहेत. या योजनेमुळे देशामध्ये सर्वाधिक असलेल्या महाराष्ट्रातील ४५ लाख कृषिपंपांना दिवसा व शाश्वत वीजपुरवठा होणार आहे. आतापर्यंत कार्यान्वित झालेल्या १९७२ मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पांमधून ३६९ उपकेंद्रांद्वारे शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यात येत आहे. सोबतच क्रॉस सबसिडीचा बोजा कमी होऊन औद्योगिक व व्यावसायिक वीज दरात घट होण्यास सुरवात झाली आहे, अशी माहिती अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली.

या बैठकीमध्ये महावितरणचे संचालक सचिन तालेवार (संचालन/प्रकल्प), योगेश गडकरी (वाणिज्य), महापारेषणचे संचालक सतीश चव्हाण (संचालन), महानिर्मितीचे संचालक अभय हरणे (प्रकल्प) तसेच कार्यकारी संचालक दिनेश अग्रवाल, किशोर पाटील, विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट व संतोष सांगळे यांची उपस्थिती होती.

# महाराष्ट्रातील दिव्यांगांच्या मागण्यांबाबत सरकार सकारात्मक

**मुंबई, दि. ४ : प्रतिनिधी**

राज्य प्रशासनात कणखर आणि स्पष्टवक्ते अधिकारी म्हणून ओळखले जाणारे आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांनी महाराष्ट्रातील दिव्यांगांच्या हक्कांवर सविस्तर संवाद साधला. या चर्चासत्रासाठी महाराष्ट्रातील निवडक पाच दिव्यांग बांधवांना आमंत्रित करण्यात आले होते. त्यामध्ये सांगली जिल्ह्याचे ज्ञानदेव कदम आणि डॉ. सतीश लड्डा यांनी लक्षणीय ठसा उमटवला.

दोघांनी मांडलेले प्रेझेंटेशन पाहून मुंढे यांनी आपल्या स्टाफसमोरच कौतुक व्यक्त करत "असं प्रेझेंटेशन माझा स्टाफ सुद्धा करत नाही" अशी प्रतिक्रिया दिली. त्यामुळे उपस्थितांचा आत्मविश्वास अधिक वाढला.

बैठकीत दिव्यांगांच्या आरक्षणाचा मुद्दा, शिक्षणातील अडथळे, रोजगाराच्या संधी, आरोग्य सुविधा तसेच शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी या विषयांवर चर्चा झाली. मुंढे यांनी धोरणात्मक स्तरावर कोणते बदल शक्य आहेत यावरही मार्गदर्शन केले.

सांगली जिल्ह्यातील प्रतिनिधींची निवड हा केवळ सन्मान नसून दिव्यांग चळवळीच्या नेतृत्वात जिल्हा आघाडीवर असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाल्याचे मत व्यक्त होत आहे.

# सर्वसामान्यांचे घराचे स्वप्न दृष्टीक्षेपात, राज्याच्या नवीन गृहनिर्माण धोरणाने काय साध्य होणार ?

**मुंबई, दि. ४ : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील गृहनिर्माण क्षेत्राला चालना देण्यासाठी राज्य सरकारने नुकतेच नवीन धोरण जाहीर केले आहे. या धोरणाचा मुख्य उद्देश माहिती पारदर्शकता आणि परवडणाऱ्या घरांचा पुरवठा वाढवणे हा आहे. यासाठी, राज्यभरातील भौगोलिक स्थान-निश्चिती केलेले नकाशे आणि डिजिटल पद्धतीने सरकारी जमिनींचा राज्यव्यापी भू-बँक तयार करण्यात येणार आहे. सर्व उत्पन्न गटांसाठी घरे परवडण्याजोगी करण्याचा सरकारचा मानस आहे. या धोरणामुळे राज्यातील शहरी विकास आणि पायाभूत सुविधांच्या गुंतवणुकीलाही गती मिळण्याची अपेक्षा आहे. जाणून घेवूया या धोरणाविषयी...

राज्य सरकारने नवीन गृहनिर्माण धोरणाअंतर्गत या नावाचे डिजिटल पोर्टल सुरू होणार आहे. यामध्ये घरांची मागणी, जमीन उपलब्धता आणि प्रकल्पांची अंमलबजावणी याबाबतची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे. हे पोर्टल 'सिंगल विंडो सिस्टीम' प्रमाणे काम करणार असून, विविध सरकारी आणि आर्थिक संस्थांचा डेटा एका प्रणालीत एकत्र केला जाणार आहे. सदर पोर्टल अद्ययावत रहावे याकरिता कृत्रिम बुद्धिमत्ता व डेटा माइनिंग टूल्स प्रणालीद्वारे विदा संकलन आणि विश्लेषण इत्यादी बाबी सदर पोर्टलवर उपलब्ध आहेत.यामध्ये महापालिका, म्हाडा, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण तसेच नियोजन संस्था आणि बँका यांचा सहभाग राहणार आहे.

राज्याने सन २०३० पर्यंत आर्थिकदृष्या दुर्बल घटकांसाठी सामाजिक गृहनिर्माण आणि अल्प उत्पन्न गट करिता ३५ लाख घरे बांधण्याचे लक्ष्य ठेवले आहे, याकरिता ७०,००० कोटींची गुंतवणूक अपेक्षित आहे. तसेच पुढील १० वर्षात ५० लाख घरांच्या निर्मितीचे उद्दिष्ट आहे. नवीन गृहनिर्माण धोरणात गरीब, अल्प उत्पन्न व मध्यम उत्पन्न गटांसाठी घरे उपलब्ध करून देण्याच्या पारंपरिक उद्दिष्टांची पुनरावृत्ती तर आहेच, पण त्याचबरोबर डिजिटल साधने आणि शासकीय जमिनींचा उपयोग यावर विशेष भर देण्यात आला आहे. याचा परिणाम सर्वाधिक नागरीकरण झालेल्या महाराष्ट्रसारख्या राज्यातील गृहनिर्माणाच्या संकल्पनांमध्ये मूलभूत बदल होणार आहे.

SHIP द्वारे इतर शासकीय / निमशासकीय विभागांचे संकेतस्थळे, उदा. गती शक्ती, महाभुलेख, महारेरा, इत्यादींशी समन्वय राखण्यात येईल. योजनांच्या अंमलबजावणीमध्ये वित्तीय शिस्त, कार्यक्षमता, गतीमानता व पारदर्शकता असावी. याकरिता सदर पोर्टलवर निधी वितरण, संनियंत्रण, विश्लेषण, उपयोगिता प्रमाणपत्रे इत्यादी बाबी समाविष्ट असतील.परिणामी, सरकारी जमीनबाबत पारदर्शक माहिती उपलब्ध होणार आहे. ही माहिती विकसकांना 'गेमचेंजर' ठरू शकते. नवीन धोरणामुळे विकासकांना स्पष्ट आणि सेवा उपलब्ध असलेल्या जमिनी मिळवणे सोपे होईल. भू-बँकमुळे सरकारी जमिनींची माहिती पारदर्शकपणे उपलब्ध होईल, ज्यामुळे परवडणाऱ्या घरांच्या प्रकल्पांतील एक मोठा अडथळा दूर होईल. याशिवाय, मागणीनुसार प्रकल्प आखता येतील. राज्य सरकारच्या नवीन गृहनिर्माण धोरणात आणखी एक महत्त्वपूर्ण बदल म्हणजे, ३१ मार्च २०२६ पर्यंत जिल्हानिहाय गृहनिर्माण मागणी सर्वेक्षण बंधनकारक करण्यात आले आहे. याकरिता महसूल, वन विभाग, जलसंपदा विभाग तसेच PM GATI SHAKTI यांचेशी समन्वय साधून सदर माहिती SHIP पोर्टलवर एकत्रित करण्यात येणार आहे. यामध्ये विविध उत्पन्न व लोकसंख्यात्मक गटांनुसार प्रत्यक्ष घरमागणी नोंदवली जाणार आहे. नवीन धोरणात मागणी सर्वेक्षण खूप महत्त्वाचे आहे. घरांची मागणी प्रत्यक्षात कोणत्या ठिकाणी आणि कोणत्या उत्पन्न गटांसाठी आहे हे निश्चित होणार आहे. यामुळे पुरवठा आणि मागणी यांच्यातील असमतोल कमी होणार आहे. या धोरणात औद्योगिक कामगार आणि स्थलांतरित श्रमिकांसाठी कामाच्या ठिकाणाजवळ घरे उपलब्ध करून देण्यावर भर दिला आहे. कोरोना महामारीच्या काळात कामगारांना झालेल्या त्रासातून हा मुद्दा पुढे आला आहे. यासाठी, भविष्यातील औद्योगिक क्षेत्रे आणि विशेष आर्थिक क्षेत्रांमध्ये अशा घरांचा समावेश केला जाईल.

# 20 लाख 96 हजारांचा गुटखा जप्त

**तलासरी, दि. ४ : प्रतिनिधी**

पालघर पोलिसांनी गणेश उत्सवाच्या पार्श्वभूमीवर अवैध धंद्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सुरू केलेल्या कारवाईत मोठे यश मिळवले आहे. स्थानिक गुन्हे शाखा, पालघर आणि तलासरी पोलीस ठाण्याच्या संयुक्त पथकाने तलासरी ईभाडपाडा येथील सुत्रकार ओव्हरब्रिजजवळ मुंबई-अहमदाबाद महामार्गावर धडक कारवाई करत तब्बल ३२ लाख ९६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून या प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. बुधवार, ३ सप्टेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेला गोपनीय माहिती मिळाली होती की, लाल रंगाचा आयसर कंपनीचा टेम्पो (क्रमांक MH10-DT-6633) यामधून गुटख्याची अवैध वाहतूक होणार आहे. या माहितीनुसार पथकाने तलासरी पोलीस ठाण्याच्या मदतीने महामार्गावर नाकाबंदी केली. काही वेळाने संशयित टेम्पो तिथे येऊन थांबल्यानंतर त्याची तपासणी करण्यात आली असता चालक बाळू किसन गंगावणे (वय ५०, रा.सांगली) व त्याचा साथीदार राजू संजय कांबळे (वय २७, रा.सांगली) यांनी सुरुवातीला टेम्पोमध्ये फ्रोझन फूड कंपनीचा माल असल्याचे सांगितले. मात्र, त्यांच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने टेम्पोची कसून तपासणी करण्यात आली असता त्यात महाराष्ट्र राज्यात बंदी असलेला तब्बल २० लाख ९६ हजार ५५० रुपयांचा सुगंधीत तंबाखू आढळून आला. या टेम्पोसह एकूण ३२ लाख ९६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे. या प्रकरणी तलासरी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ तसेच अन्न सुरक्षा मानके कायदा २००६ अंतर्गत विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील तपास तलासरी पोलिस ठाण्याचे पोउपनि अमोल चिंधे करत आहेत. सदर कारवाई पालघर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक यतिश देशमुख, अपर पोलीस अधीक्षक विनायक नरळे आणि डहाणू उपविभागीय पोलीस अधिकारी अंकिता कणसे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रदीप पाटील, तलासरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अजय गोरड तसेच त्यांच्या पथकातील अधिकाऱ्यांनी केली आहे.




## आज का अंदाज

शुक्रवार ५ सप्टेंबर २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ६ | ९ | ० | ३ | ४ | ७ | ८ |
| १३९ | १७८ | १२६ | ५६९ | १२० | ६९९ | २६९ | १३४ |
| २५६ | ३५८ | ३७९ | ४७९ | २२९ | ७७० | ४५८ | २६० |
| ३०० | २७७ | ५६८ | ३८९ | ३५५ | ५९० | १८८ | ३५० |
| ३१ | ६१ | ९२ | ०२ | ३२ | ४२ | ७१ | ८१ |
| ३५ | ६५ | ९७ | ०४ | ३० | ४० | ७५ | ८५ |
| ३८ | ६८ | ९४ | ०६ | ३९ | ४९ | ७३ | ८९ |

५ सप्टेंबर : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| २४ | ५४ | ६३ | ९३ |
| २७ | ५७ | ६० | ९० |
| २८ | ५८ | ६१ | ९१ |
| ६७९ | ५९९ | १५० | ४५० |
| ५८९ | ७७९ | २६८ | १४४ |
| ४९९ | ३४६ | ७९० | २७० |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

८ ९ ० १ २

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


# अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड (एईएमएल) कडून ४४.६६१ दशलक्ष अमेरिकी डॉलर्सच्या सीनियर सिक्योर्ड नोट्सचे मुक्त बाजारात पुनर्खरेदी पूर्ण

**अहमदाबाद, ४ सप्टेंबर :** अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड (एईएमएल) ने १५ जुलै २०२१ रोजी जारी केलेल्या यूएसडी ३०० दशलक्ष ३.८६७% सीनियर सिक्योर्ड नोट्स (२०३१ पर्यंत मुदत) संदर्भात जाहीर केले आहे.

अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड (एईएमएल), जे मुंबईतील वीज वितरण शाखा व अदाणी एनर्जी सोल्यूशन्स लिमिटेड (एईएसएल) ची उपकंपनी आहे, यांनी आपल्या यूएसडी ३०० दशलक्ष ३.८६७% सीनियर सिक्योर्ड नोट्स (२०३१ पर्यंत मुदत) पैकी यूएसडी ४४.६६१ दशलक्ष रक्कम परत खरेदी करून रद्द केली आहे. ही परत खरेदी कंपनीच्या अंतर्गत रोख प्रवाहांतून करण्यात आली असून, यामुळे एकूण थकबाकी मूळ रक्कम यूएसडी २५५.३३९ दशलक्षपर्यंत कमी झाली आहे.

ही कारवाई एईएमएल च्या सुरू असलेल्या भांडवली व्यवस्थापन योजनेचा एक भाग आहे. याआधी कंपनीने नोव्हेंबर २०२३ मध्ये यूएसडी १२० दशलक्ष टेंडर ऑफर पूर्ण केली होती, तसेच जून २०२५ मध्ये यूएसडी १,००० दशलक्ष ३.९४९% सीनियर सिक्योर्ड नोट्स (२०३० पर्यंत मुदत) अंतर्गत यूएसडी ४९.५ दशलक्ष मुक्त बाजारातील पुनर्खरेदी केली होती. या सर्व उपक्रमांतून एईएमएल ची मजबूत रोख निर्मिती क्षमता व आर्थिक लवचिकता अधोरेखित होते.

एईएमएल भविष्यात बाजाराच्या परिस्थितीनुसार इतर देणी व्यवस्थापन उपक्रमांचा विचार करू शकते, ज्यामुळे विविध मुदतीतील थकबाकी कर्ज रक्कम महत्त्वपूर्णरीत्या कमी होऊ शकते.

ही घोषणा सिक्युरिटीज विक्री किंवा खरेदीसाठी ऑफर नाही.

## राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा आव्हानात्मक असू शकतो. तुमच्या मनोबलावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो, ज्यामुळे तुम्ही गोंधळलेले वाटू शकता. कामाच्या ठिकाणी काही अडथळे येऊ शकतात.

**वृषभ :** आज तुमच्यासाठी अद्भुत आणि सकारात्मक घटना घडू शकतात. तुमचा आत्मविश्वास वाढेल आणि तुम्ही नवीन संधी ओळखू शकाल. प्रियजनांसोबत वेळ घालवण्याचा हा काळ आहे.

**मिथुन :** दैनंदिन कामांमध्ये विलंब आणि अडथळे येऊ शकतात, ज्यामुळे तुम्हाला थोडे चिंता वाटेल. हा काळ संयम राखण्याचा आणि तुमचे विचार स्पष्ट करण्याचा आहे. नातेसंबंधांमध्येही मतभेद निर्माण होऊ शकतात.

**कर्क :** स्वत:ला शांत आणि संतुलित ठेवण्याचा प्रयत्न करा. तुमच्या प्रियजनांसोबत वेळ घालवणे उपयुक्त ठरू शकते. त्यामुळे तुम्हाला मानसिक शांती मिळेल. अडचणीनंतर चांगला काळ येतो आहे.

**सिंह :** आजचा दिवस तुमच्यासाठी खूप सकारात्मक आणि उत्साही असेल. तुमच्या सभोवतालची ऊर्जा तुम्हाला प्रेरणा आणि उत्साहाने भरून टाकेल. तुमच्या वैयक्तिक जीवनात छान संधी येतील.

**कन्या :** विचारांचे नियोजन करणे आणि वेळेचे योग्य व्यवस्थापन करणे महत्वाचे असेल. संभाषणात सावधगिरी बाळगा. आर्थिक बाबींमध्येही योग्य नियोजन करणे तुमच्यासाठी महत्त्वाचे आहे.

**तुळ :** आजचा दिवस आव्हानात्मक असू शकतो. तुम्हाला मानसिक ताण जाणवू शकतो. कामाच्या ठिकाणी सहकाजयांशी समन्वय राखणे महत्वाचे आहे. काही उत्तम संधी ओळखण्यासाठी तयार राहा.

**वृश्चिक :** आजचा दिवस सुखदायी जाईल. तुमच्या भावना आणि विचार तुमच्या जवळच्या लोकांना आकर्षित करतील. आरोग्याच्या बाबतीत, तुम्ही उत्साहित आणि सक्रिय असाल.


**धनु :** आजचा दिवस तुमच्यासाठी खास असू शकतो, कारण या वेळी तुम्हाला तुमचे आंतरिक सौंदर्य आणि क्षमता ओळखण्याची संधी मिळेल. तुमचा दृष्टिकोन सकारात्मक आणि उत्साहवर्धक असेल.

**मकर :** व्यवसायात काही अनियमितता असू शकतात, म्हणून धीर धरा आणि परिस्थिती शहाणपणाने हाताळणे चांगले होईल. तुमच्या आरोग्याची काळजी घ्या आणि विश्रांतीसाठी वेळ काढा.

**कुंभ :** आजचा दिवस तुमच्यासाठी आव्हानात्मक असू शकतो. तुम्हाला तुमच्या कामात थोडे अस्वस्थ वाटेल. संवादाकडे विशेष लक्ष द्या, कारण तुमच्या शब्दांचा चुकीचा अर्थ काढला जाऊ शकतो.

**मीन :** कुटुंबासोबत वेळ घालवल्याने तुमचे नातेसंबंध मजबूत होतील. कामातही यश मिळण्याची शक्यता आहे; तुमच्या कठोर परिश्रम आणि समर्पणामुळे तुमचे कौतुक होईल.

## शब्दकोडे क्रमांक २२११




**आडवे शब्द :-**
१) दैववान,
५) वेडावाकडा
८) मेहेरबानी
१०) पाठविलेला
११) अबोलीची माळ
१३) धपाटा
१५) आयुष्य
१६) इमारतीचे बांधकाम करणारा राज
१८) पोष्टऑफिस
१९) उष्ण वा थंड नसलेले (पाणी)
२०) पुष्पदल
२१) वाघूळ
२२) षट
२३) मुस्लीम सरदार
२४) दुसऱ्याच्या मनातील विचार जाणणारा
२६) इंग्रजीत भाजणे
२७) गाढव
२८अ) कणीदार
३०) लवंडणे
३२) एक कंदमूळ
३३) छोटी लढाई
३४) व्रत
३६) मगज
३७) लाकडी जिना
३८) ढोंगी, नट, बहुरुपी
४०) धरा, पकडून ठेवा
४३) वाळवी
४५) दया
४६) लक्ष्मी
४८) बासरी
५०) साठ मिनीटे
५२) कपडालत्ता
५४) आत्याचा मुलगा
५५) शूर पुत्राला जन्म देणारी आई
५७) पृथ्वी
५८) खेळ, क्रीडा
६०) धैर्य, हिंमत
६२) सूर्याचे एक नाव
६३) फुरसत
६४) ** गण **
६७) शेतीतील काम
६९) फलक, टोपली
७०) हार
७१) मृत्यू नसलेला
७२) शेतकरी
७४) न्याय
७५) रत्न
७६) खलातील कुटण्याचे साधन

**उभे शब्द :-**
१) पुरुष
२) महाराष्ट्राचा जाणता राजा
३) नकली, खोटे
४) पर्वत
५) वाहणारी हवा
६) प्रेत वाहण्याची ताटी
७) ओटा
९) सुरळीत चालू असलेले काम बंद पाडणे (वा.प्र.)
१२) चकचकीत
१४) पुष्पदल
१७) नमस्कार
१८) हातोहात, त्वरेने
१९) दोन मैलाचे अंतर
२०) अलगुजे
२१) एक चतुर्थांश
२३) आकाश
२४) मळलेला
२५) दया, कीव
२६) न घाबरणारा
२८) टोळेचा प्रमुख
२९) श्रीविष्णुचा बटु अवतार
३१) पायाने अधू असलेला
३२) गाणे गाणारा
३३) उसाचा रस काढणारे यंत्र
३५) सर्प
३९) पोपट
४१) छिद्रातून जमिनीवर पडणारे उन
४२) दरवाजा
४४) अखेरीस
४७) एक सुगंधी वनस्पती
४८) पाप करण्यास घाबरणारा
४९) आई, ज्ञानेश्वर
५१) संतोष, आनंद
५३) पंख
५६) ताल वृक्ष
५९) लाजणारा
६१) सुरक्षित
६२) सुपारी कातरण्याचे साधन
६३) समतल
६५) दृष्टी
६६) मेलेला
६८) फळातील खाद्य
७०) पाय कवितेतील चरण
७३) अभिनेता

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# ६५४ गावांमध्ये आदि कर्मयोगी अभियानाला सुरुवात

**पालघर, दि. ४ : प्रतिनिधी**

आदिवासी व्यवहार मंत्रालयामार्फत "आदि कर्मयोगी" या राष्ट्रीय अभियानाची सुरुवात करण्यात आली आहे. हे अभियान केवळ एक योजना नसून आदिवासी समाजाच्या सर्वांगीण उत्थानासाठीची ऐतिहासिक चळवळ आहे.आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्ह्यामधील ६५४ गावांमध्ये आदी कर्मयोगी अभियान राबवण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी दिली. आदि कर्मयोगी अभियानांतर्गत एकदिवसीय अभिमुखता कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय येथे करण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे , एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी विशाल खत्री, डॉ.अपूर्वा बासुर, उपजिल्हाधिकारी रणजीत देसाई, विजया जाधव ,मांडवी वनसंरक्षक अमित भोसले , एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सहाय्यक प्रकल्प अधिकारी दीपक टिके, बन्सीलाल पाटील, राजेंद्र पाटील, तसेच जिल्ह्यातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

झारखंडमधील हजारीबाग येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते "धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पालघर जिल्ह्यातील दूर्वेस-मनोर येथून या अभियानाच्या माहिती, शिक्षण व संवाद महिमेचा शुभारंभ करण्यात आला. आदि कर्मयोगी अभियानाचा मुख्य हेतू तळागाळामधील नेतृत्व निर्माण करणे, शासकीय सेवा प्रत्येक नागरिकापर्यंत प्रभावीपणे पोहोचवणे आणि विकसित भारत २०४७ या ध्येयाच्या दिशेने आदिवासी समाजाला सक्षम करणे प्रत्येक गावासाठी 'ग्राम व्हिजन २०३०' आराखडा तयार करणे असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी सांगितले.

या अभियानाची अंमलबजावणी तीन महत्त्वाच्या गटांद्वारे होणार असून या मध्ये शासकीय अधिकारी, शिक्षक, डॉक्टर, व्यावसायिक मार्गदर्शक, स्वयंसेवक, महिला बचतगट सदस्य, आदिवासी नेते, सेवाभावी संस्था, आशा कार्यकर्त्या यांचा समावेश असणार आहे. पालघर जिल्ह्यात या अभियानाची अंमलबजावणी प्रभावीपणे सुरू असून ६५४ गावे व ८ तालुक्यांत ३९६ कॅम्पस द्वारे एकूण ५४ हजार ७७५ लाभार्थ्यांना पायाभूत सेवा (आधारकार्ड, बँक खाते इ.) पोहोचवण्यात यश आले असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी सांगितले.




९ जिल्हास्तरीय (मास्टर ट्रेनर्स) स्थानिक बदल एजंट यांना तळागळातील पोहोच वाढवण्यासाठी मार्गदर्शन केले जाईल . जिल्ह्यातील ८ तालुक्यातील ४० अधिकारी (ब्लॉक-लेव्हल ) यांचाही समावेश असणार आहे. या अभियानामुळे सरकार व आदिवासी समाज यांच्यातील विश्वास अधिक दृढ होणार आहे. युवक आणि महिलांना नेतृत्वाची संधी मिळेल, स्थानिक समस्यांवर गावकऱ्यांसोबत उपाय शोधले जातील तसेच शासकीय योजना दुर्गम भागात अधिक प्रभावीपणे पोहोचतील. आदि कर्मयोगी अभियान" हे सेवा, संकल्प आणि समर्पण या मूल्यांवर आधारित असून आदिवासी समाजाच्या विकासाला चालना देणारी एक क्रांतिकारी चळवळ ठरणार असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी सांगितले.

केंद्र, राज्य, जिल्हा व पंचायत स्तरावर प्रतिसाद गट तयार करून योजनांचे कन्व्हर्जन व एकात्मिक विकास साधणे. प्रत्येक स्तरावर नोडल अधिकारी यांची नेमणूक करण्यात येणार आहे. तालुका मास्टर ट्रेनर नियुक्त करून जिल्हा प्रोसेस लॅब गठीत करून ग्राम कृती आराखडे तयार करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी संबंधित विभागाला दिल्या आहेत.

'आदी कर्मयोगी' अभियानाद्वारे सरकारी अधिकारी, शिक्षक, डॉक्टर, सामाजिक कार्यकर्ते, स्वयंसेवक आणि स्थानिक नेते एकत्र येऊन आदिवासी भागाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करतील. वितरणातील तफावत भरून काढणे, ग्राम दृष्टीकोन २०३० आराखडे तयार करणे, स्थानिक संस्कृती व भाषांचे संवर्धन करणे आणि सरकार व समाज यांच्यातील विश्वास दृढ करणे हे अभियानाचे प्रमुख हेतू असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी सांगितले.

"आदी कर्मयोगी अभियान हे केवळ योजना नसून सामाजिक परिवर्तनाची चळवळ आहे. पालघर जिल्ह्यातील प्रत्येक आदिवासी बहुल गावामध्ये या उपक्रमाचा ठसा उमटवला जाईल, असे जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे तसेच उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून एकदिवसीय अभिमुखता कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. यावेळी स्टेट प्रोसेस लॅब, नाशिक येथे प्रशिक्षित झालेले जिल्हा मास्टर ट्रेनर यांची ओळख करून देण्यात आली. तसेच धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानाची माहिती सहायक प्रकल्प अधिकाऱ्यांनी दिली. नाशिक येथे २२ ते २५ ऑगस्ट दरम्यान झालेल्या प्रशिक्षणाचा आढावा जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी घेतला.

## गौरी विसर्जनाला गेलेल्या वृद्धाचा बुडून मृत्यू

**डहाणू, दि. ४ : प्रतिनिधी**

डहाणू तालुक्यातील वाघाडी येथील लोकप्रिय पर्यटनस्थळ असलेल्या भीमबांध येथे मंगळवारी संध्याकाळी गौरी विसर्जनासाठी गेलेल्या खानिव गावातील शांताराम मंगळ्या चौरे या ६२ वर्षीय वृद्धाचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेने परिसरात शोक व्यक्त करण्यात येत आहे.

शांताराम चौरे हे वाघाडी येथील नातेवाईकांकडे गौरी गणपतीच्या सणानिमित्त आले होते. विसर्जनानंतर ते आंघोळीच्या उद्देशाने भीमबांध परिसरात गेले असता सूर्या नदीत कवडास धरणातून सोडलेल्या पाण्यामुळे निर्माण झालेल्या तीव्र प्रवाहात ते वाहून गेले. ग्रामस्थांनी तातडीने शोधमोहीम सुरू केली. मात्र, जोरदार पाण्यामुळे शोधकार्य अडथळयात आले. रात्रभर आणि दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत प्रयत्न सुरू ठेवण्यात आले.

अखेर बुधवारी दुपारी पाणी ओसरल्यानंतर भीमबांध परिसरात त्यांचा मृतदेह आढळला. या घटनेनंतर खानिव गावात हळहळ व्यक्त होत आहे. शांताराम चौरे हे गावातील सर्वांना आपुलकीने वागणारे म्हणून परिचित होते. त्यांच्या अकस्मात निधनाने कुटुंबीय आणि नातेवाईकांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. भीमबांध परिसरात यापूर्वीही अशा प्रकारचे अपघात घडले असून, ग्रामपंचायतीने पर्यटकांना सावधगिरीचा इशारा देण्यासाठी ठिकठिकाणी फलक लावले आहेत. तरीदेखील पर्यटक पाण्यात उतरतात, असे सरपंच प्रशांत सातवी यांनी सांगितले. त्यांनी नागरिकांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे.

## रिक्षाचालकही आता अमली पदार्थ विक्रीत

**वसई, दि. ४ : प्रतिनिधी**

मीरा भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखा वसई युनिटने नालासोपारा पूर्वेकडील तुळींज रोड रिक्शा स्टँडवर एका रिक्शा चालकाला ब्राऊन शुगर हा अमली पदार्थासह रंगेहाथ अटक केली आहे. याअटकेनंतर आता रिक्शाचालकही अमली पदार्थ विक्रीत सहभागी असल्याची नवी माहिती उजेडात आली आहे.

बजरंग सुरेश कसबे (वय २५ वर्षे, रा. साई प्रेरणा अपार्टमेंट, तुळींज रोड, नालासोपारा पूर्व) असे रिक्शाचालकाचे नाव आहे. पोलिसांनी त्याच्याजवळ केलेल्या चौकशीत त्याने ब्राऊन शुगर विकण्यासाठी अंकुश लहू गवा (वय १९ वर्षे, रा. किसन चाळ, नगीनदास पाडा, नालासोपारा पूर्व) याच्याकडून विकत घेतल्याची माहिती दिल्यावर पोलिसांनीही अंकुश गवालाही अटक केली आहे.

ही कारवाई करत असलेल्या गुन्हे शाखेच्या पथकाने कार्तिक संतोष देसाई (वय २७ वर्षे, रा. ओमनगर चाळ, नगीनदास पाडा, नालासोपारा पूर्व) आणि अक्षय नंदकिशोर मेस्त्री (वय २७ वर्षे, रा. मोरेगाव, नालासोपारा पूर्व) यांना गांजा बाळगल्याप्रकरणी ताब्यात घेतले. चौकशीत यादोघांनी गांजा अंकुश बबन इंगोले (रा. मोरेगाव, नालासोपारा पूर्व) याच्याकडून विकण्यासाठी आणल्याची माहिती दिल्यावर पोलिसांनी अंकुशलाही अटक केली आहे. याआरोपींकडून ९६ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## सरकारने काढलेल्या अध्यादेशाचा निषेध करत मुरबाडमध्ये ओबीसी समाजाचे जोरदार साखळी उपोषण!

**मुरबाड, दि. ४ : प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकारने मनोज जरांगे यांच्या मुंबई येथील उपोषणाची दखल घेऊन हैद्राबाद गॅझेटची अंमलबजावणी करण्याचे मान्य केले आहे. त्याबाबतचा अध्यादेश काढला आहे. सरकारचा हा अध्यादेश ओबीसी समाजावर अन्याय करणारा असुन , सातारा गॅझेट सुद्धा ओबीसींवर अन्यायकारक असल्याने ओबीसी समाजामध्ये सरकार विरोधात तीव्र संतापाची लाट उसळताना दिसत आहे.याविषयी सरकारने काढलेल्या या अध्यादेशाच्या विरोधात व ईतर काही मागण्यांसाठी दि. ४ रोजी मुरबाड तालुक्यातील सर्व ओबीसी संवर्गातील आगरी,कुणबी, नाभिक,शिंपी, सोनार, कुंभार,तेली,व ईतर अशा ओबीसी समाजातील सर्व घटकांनी एक दिवसीय साखळी उपोषण करत सरकारचा निषेध केला. यावेळी आंदोलकांच्या वतीने जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.याप्रसंगी ओबीसी समाजाच्या वतीने काही प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. यापैकी पहिली मागणी अशी आहे कि,जातनिहाय जनगणना करणे, मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातुन दाखले सरसकट कुणबी दाखले देऊ नये,मराठा समाजाचे ओबीसीकरण करू नये ,ज्ञानज्योति फूले आधार योजना सुरु करणे,ठाणे जिल्ह्यात ओबीसी विद्यार्थी वसतिगृह सुरु करणे इत्यादी मागण्यांचे निवेदन सरकारकडे देण्यात आले.

## उल्हासनगरच्या बालकनजी बारी शाळेत शिक्षक दिन उत्साहात साजरा

**उल्हासनगर, दि. ४ : प्रतिनिधी**

उल्हासनगर कॅंप ३ येथे असलेल्या बालकनजी बारी ट्रस्ट द्वारा संचालित शाळेत आज शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला .या वेळी शिक्षकांना पुरुस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

उल्हासनगर कॅंप ३ येथील बालकनजी बारी ट्रस्ट द्वारे संचालित प्राथमिक व माध्यमिक शाळेत बहुतांश महिला शिक्षिका आणि महिला कर्मचारी असून या शाळेतील दहावी चा निकाल नेहमी शंभर टक्के च्या आसपास असतो. आज शिक्षक दिनानिमित्त शाळेत विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बालकन जी बारी ट्रस्ट च्या उपाध्यक्षा जया मोहन साधवानी, मध्यवर्ती पोलीस ठाण्याचे पीएसआय सचिन पवार, गोपनीय विभागाचे अधिकारी दीपक देशमुख, आर पी आय नेते माजी नगरसेवक प्रमोद टाळे आणि ट्रस्टी अर्जुन पंजाबी उपस्थित होते. या वेळी शिक्षकांचा सत्कार करताना विद्यार्थ्यांना शिक्षक दिनाचे महत्त्व सांगत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच, बालकनजी बारी ट्रष्ट च्या वतीने शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम राबवण्यात महत्वाची भूमिका बजवणाऱ्या उपाध्यक्षा जया साधवानी आणि सचिव मोहन साधवानी यांचे कौतुक करण्यात आले.

या कार्यक्रमा दरम्यान सोबर लाईफ फाऊंडेशनकडून "मद्य आणि ड्रग्स विरोधात जनजागृती" या विषयावर विशेष सादरीकरण करण्यात आले. फाउंडेशन चे विशाल साधवानी द्वारे सोबर लाईफ संचालित केले जात आहे. ही संस्था व्यसनमुक्ती केंद्र चालवून लोकांना नशेच्या विळख्यातून बाहेर काढून चांगले आयुष्य जगण्याची प्रेरणा देते.

## अंबरनाथ पुर्व येथील हनुमान मंदिराशेजारी कचऱ्याचे ढीग, सणासुदीत भाविक त्रस्त

**अंबरनाथ, दि. ४ : प्रतिनिधी**

सणासुदीच्या दिवसांत अंबरनाथ शहराला अस्वच्छतेने विळखा घातला आहे. अंबरनाथ पूर्वेकडील बी केबिन रोडवरील ताडवाडी येथे असलेल्या हनुमान मंदिराशेजारी कचऱ्याचे ढीग साचले असून, त्यामुळे परिसराला दुर्गंधीने वेढले आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे मंदिर आणि आसपासच्या परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. यामुळे, दर्शनासाठी येणारे भाविक आणि स्थानिक रहिवाशांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

**प्रशासनाच्या दुर्लक्षाने शहराच्या सौंदर्याला गालबोट**

बी केबिन रोड हा शहरातला एक महत्त्वाचा मार्ग आहे, जिथे नेहमीच वर्दळ असते. तरीही, या मार्गावर मोठ्या प्रमाणावर कचरा टाकला जातो. नागरिक सायकल, गाडी आणि गोण्यांमध्ये भरून कचरा येथे फेकून जातात. परिणामी, रस्त्याच्या कडेला कचऱ्याचे डोंगर तयार झाले आहेत, ज्यामुळे परिसरात कमालीची दुर्गंधी पसरली आहे. सध्या गणेशोत्सवाचा काळ असल्याने, मंदिरात येणाऱ्या भाविकांना या घाणीचा सामना करावा लागत आहे. या परिस्थितीमुळे शहराच्या सौंदर्याला गालबोट लागत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

**आरोग्याचा धोका वाढला**

पावसामुळे या कचऱ्यातून अधिक दुर्गंधी येत आहे आणि रोगराई पसरण्याची भीती वाढली आहे. साचलेल्या कचऱ्यामुळे डास आणि माशांचे प्रमाण वाढले आहे, ज्यामुळे डेंग्यू, मलेरियासारख्या साथीच्या रोगांचा धोका वाढला आहे. लहान मुले आणि वृद्ध व्यक्तींना या दुर्गंधीचा सर्वाधिक त्रास होत आहे. प्रशासनाने तातडीने यावर लक्ष घालून कचरा हटवावा आणि परिसरात स्वच्छता मोहीम राबवावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

## मोखाडा तालुक्यातील दुर्लक्षित धबधब्यांच्या संवर्धनाची गरज

**मोखाडा, दि. ४ : प्रतिनिधी**

मोखाडा तालुका हा धबधब्यांचे माहेरघर आहे.शंभरापेक्षा जास्त लहान मोठे धबधबे पर्यटकांना दरवर्षी खुणावत असतात.असेच दोन सुंदर पण दुर्लक्षित राहिलेले धबधबे डोल्हारानजिक तळ ठोकून आहेत.परंतू पर्यटकांना त्याची माहिती नसल्याने हौशी पर्यटक या रमनीय नजर सुखाला मुकलेले आहेत. त्याचाच हा छोटासा परिचय वर्षा सहलीला आसूसलेल्या पर्यटकांना खुल्या दिलाने करून देत आहे.



डोल्हारा गावापासून अगदी हाकेच्या अंतरावर उबडा कपारा हा बारमाही वाहणारा निर्धोक धबधबा पर्यटकांपासून आजही दुर्लक्षित राहिलेला आहे. काळ मांडवी, दाबोसा, एव्हढेच काय तर अशोका धबधब्या इतकीही धोकादायक परिस्थिती याठिकाणी नाही. त्यामुळे हौशी पर्यटकांना या धबधब्याचा मनमुराद आनंद लुटता येणार आहे.

खोडाळा - मोखाडा राज्य मार्गावरील देवबांधचा घाट चढून वर आले की डोल्हारा गावाच्या मागेच खोडाळाकडून जाताना उजव्या हाताला कोथळी धबधबा आहे. हाही धबधबा तसा धोकादायक नाही. परंतु याठिकाणी पोहचणे मात्र कमालीचे, जिकिरीचे आणि तसदीचे आहे. प्रत्यक्ष जागेवर पोहचायला जिगरबाज काळजाचे धाडस लागणार आहे. परंतु तिथे पोहचल्यावर मात्र आपला आनंद द्विगुणित झाल्याशिवाय राहत नाही. परंतू या दोन्हीही धबधब्यांची पर्यटकांना माहिती नसल्यामुळे नजरेआड राहिलेले आहेत.या धबधब्यांच्या संवर्धनाची आणि रहदारीच्या मार्गाची पर्यटन विभागाने योग्य ती रस्त्याची सुलभता केल्यास पर्यटकांना वर्षा सहलीचा बिनधास्त मनमुराद आनंद लुटता येणार आहे.

**इथे याल कसे...**


मुंबईकडून येणाऱ्या पर्यटकांनी कसारा रेल्वे स्थानक येथून खोडाळा येथे येऊन पुढे देवबांध येथील प्रसिद्ध सुंदर नारायण गणेशाचे दर्शन घेऊन सरळ डोल्हारा कडे प्रस्थान करायचे.अगदी पायीच निसर्ग सौंदर्य निरखत गेले तरी फक्त 15 ते 20 मिनिटांत कोथळी धबधब्याजवळ जाता येते.तेथूनच पुढे त्याच रस्त्याने डोल्हारा येथे पोहोचलात की अगदी हाकेच्या अंतरावरच उपरा धबधबा आहे.मुंबई किंवा नाशिक कुठूनही आलात तरी खोडाळा येथून पुढे मार्गस्थ होणे सोयीचे आहे.तसेच नाशिक, पालघर, वसई, विरार येथून मोखाडा चौफुलीवर येऊन खोडाळा जाणाऱ्या हमरस्त्याने रस्त्याने डोल्हारा याठिकाणी पोहचू शकता.

## भिवंडीत उड्डाणपुलावर दोन भरधाव कारचा अपघात

### दुचाकीस्वाराचा उड्डाणपुलावरून थेट रस्त्यावर पडून दुर्दैवी मृत्यू

**भिवंडी, दि. ४ : प्रतिनिधी**

भिवंडी शहरातील स्वर्गीय हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे हा उड्डाणपूल अपघातांचा हॉटस्पॉट ठरला आहे.बुधवारी सायंकाळी साडेचार वाजताच्या सुमारास या पुलावर दोन भरधाव कारमध्ये झालेल्या धडकेत कार जागेवर वळल्याने कार मागील दुचाकीस्वाराची थेट कारला ठोकर लागल्याने झालेल्या विचित्र अपघातात दुचाकीस्वार वरून उडून खालील रस्त्यावर पडल्याने त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.राहुल दादाराम तरे (३२ रा.अंजूर) असे मयत दुचाकीस्वाराचे नाव असून कार चालक अब्दुल्ला मोहम्मद इलियास अन्सारी (रा.मिल्लत नगर) हा गंभीर जखमी झाला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भिवंडी कडून कल्याण च्या दिशेने होंडा सिटी कार क्रमांक एम एच ४३ ए एफ १६०१ चा चालक अब्दुल्ला मोहम्मद इलियास अन्सारी हा भरधाव वेगाने चालला होता.भादवड येथील अरिहंत सिटी समोर आली असता त्यावेळी समोरून येणाऱ्या महिंद्रा एक्स यू व्ही कार क्रमांक एम एच ४८ बी एच ८१९८ यांच्यात जोरदार धडक झाली .ज्यामुळे दोन्ही कारच्या समोरील बाजूचे अतोनात नुकसान होऊन कार चालक अब्दुल्ला गंभीर जखमी झाला.तर महिंद्रा एक्स यू व्ही कार मधील एअर बॅग उघडल्याने ते बचावला असून त्यास किरकोळ मार लागला आहे.या अपघातात होंडा सिटी कार जागेवरच वळल्याने याच वेळी होंडा सिटी कार मागून वेगाने येणाऱ्या दुचाकीची धडक कारला बसल्याने दुचाकीस्वार राहुल तरे हा थेट उड्डाणपुलावरून ५० फूट खालील रस्त्यावर फेकला गेला. ज्यामध्ये राहुलचा जागेवरच मृत्यू झाला आहे.तर कार चालक जखमी झाला आहे.या उड्डाणपुलावर या आधीही अपघात झाल्याने उड्डाणपुलावरून थेट रस्त्यावर पडून झालेल्या अपघातात तीन जणांचा बळी गेला आहे. पुलावरील अरुंद रस्ता व दुभाजक नसल्याने या मार्गावर नेहमीच अपघाताच्या घटना घडत आहेत. याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात अपघाती घटनेची नोंद घेतली जात आहे.राहुलच्या दुर्दैवी मृत्यू नंतर अंजूर गावात शोककळा पसरली आहे.

## बोगस डॉक्टरने घेतला मच्छीमाराचा बळी; उत्तनकरांचा संताप अनावर

**भाईंदर, दि. ४ : प्रतिनिधी**

भाईंदर पश्चिमेकडील उत्तन गावात बोगस डॉक्टरने थाटलेल्या रुग्णालयात चुकीच्या उपचारामुळे ग्लेस्टन गिल्बर्ट घोन्सालवीस (वय ३२ वर्षे) याचा मृत्यू झाला आहे. ही घटना समजताच उत्तन गावातील गावकऱ्यांच्या संतापानंतर उत्तन पोलिसांनी बुधवारी रात्री बोगस डॉक्टरविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

फय्याद आलम या बोगस डॉक्टरने उत्तन नाका येथील दोन मजली इमारत भाड्याने उत्तन चॅरिटेबल क्लिनिक नावाचे रुग्णालय थाटले आहे. त्याठिकाणी ओपीडीसह रक्त तपासणी सुरु करून रुग्णांवर उपचार सुरु केले आहेत. उत्तनच्या नवीखाडी भागात राहणाऱ्या ग्लेस्टन घोन्सालवीस या मच्छिमाराची तब्बेत बरी नसल्याने तो उपचारासाठी सोमवारी यादवाखान्यात गेला होता. त्यावेळी बोगस डॉक्टर फय्याज आलम याने औषधे दिली. तसेच संध्याकाळी रक्त तपासणीसाठी पुन्हा बोलावले होते.

संध्याकाळी ग्लेस्टन दवाखान्यात आल्यावर फय्याज आलमने त्याल सलाईनमधून इंजेक्शन दिले. त्यानंतर अवघ्या अर्ध्या तासातच ग्लेस्टनला प्रचंड थंडीताप आणि त्याची




प्रकृत्ती बिघडली. त्यामुळे कुटुंबियांनी ग्लेस्टनला जवळच्या रुग्णालयात नेले असता त्याठिकाणी डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. तरुणाचा मृत्यू झाल्याने गावकरी प्रचंड संतापले होते. गावकऱ्यांनी पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार देत बोगस डॉक्टर फय्याज आलमवर गुन्हा दाखल करून कारवाई करण्याची मागणी केली होती. पण, पोलिसांनी दुर्लक्ष केल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे.

पोलीस गुन्हा दाखल करत नसल्याने बुधवारी स्थानिक माजी नगरसेविका शर्मिला बगाजी, मनसेचे संदीप राणे यांच्यासह उत्तनमधील मच्छिमारांनी उत्तन पोलीस ठाण्यात जाऊन वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिवाजी नाईक यांना गुन्हा दाखल करून फय्याजला ताबडतोब अटक करा अन्यथा आंदोलन करू असा इशारा दिला. आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर मीरा भाईंदर महापालिका प्रशासनाने फय्याज आलमची महापालिकेकडून कोणतीच परवानगी घेतली नसल्याचे आणि त्याच्याकडे वैद्यकीय व्यवसाय करण्यासाठी कोणतीही अधिकृत कागदपत्रे नसल्याचे पत्र देत उत्तन भागातील महापालिका वैद्यकीय अधिकारी डॉ. अशोक पाडवी यांनी देण्यात आले. त्यानंतर डॉ. अशोक पाडवी यांच्या तक्रारीवरून बुधवारी रात्री फय्याद आलमविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

उत्तनसारख्या मोठ्या गावात भरवस्तीत फय्याज आलम दोन मजली इमारतीत महापालिकेचा परवाना न घेताच रुग्णालय, रक्त तपासणी केंद्र थाटून गेल्या दोन-अडीच महिन्यांपासून रुग्णांवर उपचार करत त्यांच्या जीवाशी खेळत होता. विशेष म्हणजे त्याच्या रुग्णालयाच्या फलकावर त्याचे नाव आणि पदवीदेखिल नव्हती. असे असतानाही महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून कोणतीच कारवाई न केल्याने अखेर ग्लेस्टन घोन्सालवीसचा बळी गेला.

दरम्यान, याप्रकरणी मच्छिमार नेते बर्नड डिमेलो यांनी सखोल चौकशी करून सर्व संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## लालबाग राजाच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांचा अपघात एकाचा मृत्यू पाच जखमी

**वसई, दि. ४ : प्रतिनिधी**

मुंबई अहमदाबाद महामार्गावर फाउंटन हॉटेल नजीक रस्त्यावर निष्काळजीने व बेपर्वा वृत्तीने उभे केलेल्या वाहनामुळे झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू तर अन्य पाच प्रवासी जखमी झाल्याची घटना घडली.

यातील पटेल केतुलभाई हितेश भाई वय वर्ष (३२) यांचा मृत्यू झाला तर त्यांच्यासोबत असलेली निराली शर्मा व तिच्या चार मैत्रिणी सर्व राहणार वडोदरा, गुजरात या जखमी झाल्या आहेत. त्यांना मीरा रोड येथील ऑर्बिट हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले. दि ३ सप्टेंबर रोजी संध्याकाळी सात वाजताच्या सुमारास ईरटीका गाडी क्रमांक जी जे ०६- पीआर ३०१९ मधुन सर्वजण लालबागचा राजा येथे गणपतीच्या दर्शनासाठी जात होते. यावेळी आईसर गाडी क्रमांक एम एच ०३ सि व्ही ६२६८ इंडिकेटर न लावता रस्त्यात वाहन उभे केले होते. ढगाळ वातावरण व पसरलेला अंधार यामुळे चालकाला गाडी दिसून आली नाही. परिणामी घडलेल्या अपघातात संबंधिताचा मृत्यू झाल्यामुळे आईसर गाडीचा आरोपी चालक सूर्यवली तिवारी (५८) रा. गोम्स कंपाउंड, मुंबई याच्या विरोधात नायगाव पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४४८/२०२५ नुसार नोंद करण्यात आली आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक करोडीवाल करीत आहेत.

## दैनिक महासागर प्रस्तुत 'आमचा लाडका गणेश'

दैनिक महासागर प्रस्तुत "आमचा लाडका गणेश" या सदरासाठी आपल्या घरगुती तसेच सार्वजनिक बाप्पांचे सुबक छायाचित्रे 9137362297 या क्रमांकावर पाठवावेत. चांगल्या छायाचित्रांना दैनिक महासागर मध्ये ठळकपणे प्रकाशित करण्यात येईल...


श्री. विनोद पेडणेकर. परीवार एडनवाला कंपाऊंड , परेल (पुर्व).


हर्ष सातोसकर परीवार , बी.आय.टी चाळ. डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड परेल. (पुर्व).


गणेश तरुण मंडळ बेलेवाडी (मासा) तालुका कागल, जिल्हा कोल्हापूर वर्ष.. 14 वे


अंकिता / प्रणित आनंद भंडारे. लालबाग.

# सेंसेक्समध्ये 150 अंकांची वाढ

## जीएसटीमध्ये कपातीमुळे ऑटो सेक्टरमध्ये मोठी खरेदी





**सेन्सेक्स 80,718**

**निफ्टी 24,734**

मुंबई, दि. ४ प्रतिनिधी

गुरुवारी शेअर बाजार वाढीसह बंद झाला. गुरुवारी सुरुवातीच्या व्यवहारात शेअर बाजारात चांगली तेजी दिसून आली कारण जीएसटीमध्ये कपातीच्या निर्णयाने गुंतवणूकदारांना बाजारात गुंतवणुकीचा विश्वास दिला. मात्र दिवसाच्या शेवटी ही तेजी किरकोळ वाढीत रुपांतरित झाली आणि दोन्ही बेंचमार्क निर्देशांक किंचित वाढीसह बंद झाले.

गुरुवारी सेंसेक्सने ८१,४५६ च्या स्तरावर सुरुवात केली होती आणि दिवसाच्या शेवटी तो ०.१९ टक्क्यांच्या वाढीसह ८०,७१८ च्या स्तरावर बंद झाला. गुरुवारी निफ्टी ५०, २४,९८० च्या स्तरावर उघडला होता आणि दिवसाच्या शेवटी तो ०.०७ टक्क्यांच्या वाढीसह २४,७३४ च्या स्तरावर बंद झाला. बेंचमार्क निर्देशांकांच्या उलट बीएसई मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांकांची कामगिरी खराब राहिली. बीएसई मिडकॅप निर्देशांक आणि स्मॉलकॅप निर्देशांकात ०.६० टक्क्यांची घसरण झाली.

या दरम्यान, बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे बाजारमूल्य मागील सत्रातील ४५२.८ लाख कोटी रुपयांवरून घसरून ४५१.५ लाख कोटी रुपये झाले. त्यामुळे गुंतवणूकदारांना एका दिवसात १ लाख कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागला.

निफ्टी ५० मधील कंपन्यांमध्ये सर्वाधिक फायदा महिंद्रा अँड महिंद्राला झाला, ज्यात तब्बल ६ टक्क्यांपर्यंतची वाढ झाली. त्यानंतर बजाज फायनान्समध्ये ४.२९ टक्क्यांची वाढ, अपोलो हॉस्पिटलमध्ये २.१२ टक्क्यांची वाढ, बजाज फिनसर्व्हमध्ये १.८४ टक्क्यांची वाढ, नेस्ले इंडियामध्ये १.४९ टक्क्यांची वाढ झाली.

निफ्टी ५० मधील कंपन्यांमध्ये सर्वाधिक तोटा टाटा कन्झ्युमरला झाला, जो ३.०२ टक्क्यांनी घसरला. त्यानंतर एचडीएफसी लाइफमध्ये २.८६ टक्क्यांची घसरण, विप्रोमध्ये १.८४ टक्क्यांची घसरण, मारुती सुझुकीमध्ये १.७८ टक्क्यांची घसरण, इंडसइंड बँकेत १.७३ टक्क्यांची घसरण झाली.

शेअर बाजारात वाढ असूनही बहुतेक सेक्टोरल निर्देशांक लाल निशाणावर बंद झाले. सर्वाधिक घसरण निफ्टी इंडिया डिफेन्समध्ये झाली, जो १.७२ टक्क्यांनी घसरला. त्यानंतर निफ्टी पीएसयू बँक मध्ये १.११ टक्क्यांची घसरण, निफ्टी एनर्जीमध्ये ०.९९ टक्क्यांची घसरण, निफ्टी ऑईल अँड गॅसमध्ये ०.९६ टक्क्यांची घसरण, निफ्टी आयटीमध्ये ०.९४ टक्क्यांची घसरण, निफ्टी रिअल्टीमध्ये ०.७८ टक्क्यांची घसरण, निफ्टी मीडियामध्ये ०.६८ टक्क्यांची घसरण झाली.

जीएसटीमध्ये कपातीमुळे सर्वाधिक तेजी ऑटो सेक्टरमध्ये झाली आणि निफ्टी ऑटो ०.८५ टक्क्यांच्या वाढीसह बंद झाला. त्यानंतर निफ्टी ग्रोथ सेक्टरमध्ये ०.७४ टक्क्यांची वाढ, निफ्टी एफएमसीजीमध्ये ०.२४ टक्क्यांची वाढ झाली.

# जगाला माहीत आहे की भारत सर्वांना समान आणि न्याय्य वागणूक देतो - पियूष गोयल

नवी दिल्ली, दि. ४ वृत्तसंस्था

भारतातील जीएसटी कर आकरणी पद्धतीत नुकत्याच सुधारणा करण्यात आल्या आहे. या जीएसटी सुधारणांचे कौतुक करताना, केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी 'आत्मनिर्भर भारत' करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल असल्याचे म्हटले आहे. १४० कोटी भारतीयांच्या संकल्पाने २०४७ पर्यंत देश 'विकसित भारत' होण्याच्या दिशेने भक्कमपणे वाटचाल करेल असेही गोयल यांनी नमूद केले.



"जगाला माहीत आहे की भारत सर्वांना समान आणि न्याय्य वागणूक देतो. भारतात कायद्याचे राज्य आहे, न्यायालये आहेत, सशक्त माध्यम व्यवस्था आहे, संसद आहे. भारत एक सशक्त लोकशाही म्हणून जगाला आत्मविश्वास देतो. भारतात मोठ्या प्रमाणात तरुण लोकसंख्या असून, १४० कोटी भारतीय लोकांची वस्तू आणि सेवांवरील मागणी मोठी आहे. याचबरोबर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे निर्णायक नेतृत्वही आहे. या सगळ्या वैशिष्ट्यांमुळे भारताची ओळख ठरते", असे केंद्रीय मंत्री गोयल यांनी सांगितले.

आयपीएचएक्स २०२५ च्या औषध आणि आरोग्यसेवेवरील आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात बोलताना केंद्रीय मंत्री पीयूष गोयल म्हणाले, "कालच्या जीएसटी सुधारणा म्हणजे आत्मनिर्भर भारत करण्याच्या दिशेने टाकलेले एक पाऊल आहे. १४० कोटी भारतीय २०४७ पर्यंत भारताला, विकसित भारत बनवण्याच्या सामूहिक संकल्पासह एकत्र येत आहेत. याद्वारे प्रत्येकाला संधी मिळेल, प्रत्येकजण भारताच्या समावेशक आणि शाश्वत विकासाच्या प्रवासात सहभागी होईल."

"२०४७ पर्यंत, आपण ४ ट्रिलियन डॉलर्सच्या अर्थव्यवस्थेपासून ३० ट्रिलियन डॉलर्सच्या अर्थव्यवस्थेपर्यंत पोहोचू. भारत आज जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. अत्यंत अस्थिर, अनिश्चित, खराब हवामान, भू-राजकीय तणावातही, भारताचा ७.८% दराने विकास दर होत आहे आणि ते तेव्हाच शक्य आहे जेव्हा तुमच्याकडे नरेंद्र मोदींसारखा नेता देशाचे मार्गदर्शन आणि नेतृत्व करण्यासाठी असतो", असे गोयल यांनी पुढे म्हटले.

## बलात्कार प्रकरणातील आरोपी 51 दिवसाच्या तुरुंगवासानंतर निर्दोष मुक्त

### चुकून तक्रार दाखल केली होती - तक्रारदार

कोलकाता, दि. ४ वृत्तसंस्था

पश्चिम बंगालमधील कोलकाता शहरातील एका न्यायालयाने बलात्काराच्या आरोपीला निर्दोष मुक्त केलं आहे. कारण तक्रारदार महिलेने दावा केला आहे की तिने 'गैरसमजातून' तक्रार दाखल केली होती. आरोपीने सदर प्रकरणात ५१ दिवस तुरुंगवास भोगल्यानंतर त्याची सुटका झाली आहे. २४ नोव्हेंबर २०२० रोजी महिलेने दाखल केलेल्या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी या आरोपीला अटक केली होती. त्यानंतर काही दिवसांनी त्याला जामीन मिळाला. तत्पूर्वी ५१ दिवस तो तुरुंगात होता.

महिलेने तिच्या तक्रारीत म्हटलं होतं की २०१७ पासून तिचे या इसमाबरोबर प्रेमसंबंध होते. या काळात या इसमाने तिला लग्नाचं अमिष दाखवून तिच्याबरोबर शरीरसंबंध ठेवले होते. मात्र, दुसऱ्या दिवशी त्याने लग्न करण्यास नकार दिला आणि तिथून पळून गेला. त्यानंतर महिलेने पोलिसांत तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी सदर इसमाला अटक केली. १४ जानेवारी २०२१ रोजी त्याला न्यायालयाने जामीन दिला. तत्पूर्वी ५१ दिवस तो तुरुंगात होता.

दरम्यान, आता या महिलेने न्यायालयाला सांगितलं की तिने चुकून या व्यक्तीविरोधात तक्रार दाखल केली होती. ती म्हणाले, "पोलिसांत दिलेली तक्रार मी नव्हे तर माझ्या मित्राने लिहिली होती. तक्रार अर्जात काय लिहिलंय हे वाचण्याऐवजी मी थेट त्यावर स्वाक्षरी केली होती."

महिलेने तिच्या तक्रारीत म्हटलं होतं की "या व्यक्तीने लग्नाचं वचन देऊन मला सॉल्ट लेक येथील एका हॉटेलमध्ये नेलं. तिथे माझ्याबरोबर शरीरसंबंध ठेवले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी लग्नाबद्दल विचारल्यानंतर त्याने नकार दिला आणि तिथून पळून गेला. तो काही दिवसांनी कोलकात्यामधून फरार झाला." सदर व्यक्ती फरार झाल्यानंतर महिलेने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी २५ नोव्हेंबर २०२० रोजी आरोपीच्या मुसक्या आवळल्या. त्यानंतर तो ५१ दिवस तुरुंगात होता. न्यायालयाने १४ जानेवारी २०२१ रोजी त्याचा जामीन मंजूर केला. तेव्हापासून हा इसम जामीनावर बाहेर आहे. मात्र, आता तक्रारदार महिलेने तक्रार मागे घेतली आहे.


करी रोडचा कैवारी, बाळ गोपाळ सार्वजनिक मंडळ करी रोड मुंबई

## विधेयकांचे भवितव्य राज्यपालांच्या मर्जीवर नसावे!

### पश्चिम बंगाल सरकारचा सर्वोच्च न्यायालयात युक्तिवाद

नवी दिल्ली, दि. ४ वृत्तसंस्था

राज्याच्या विधानसभांनी संमत केलेली विधेयके ही जनतेच्या इच्छांचे स्वरूप असते, त्याचे भवितव्य राज्यपाल आणि राष्ट्रपतींच्या मर्जी आणि लहरींवर अवलंबून असू नये, असा युक्तिवाद पश्चिम बंगाल सरकारने बुधवारी सर्वोच्च न्यायालयात केला. राज्यपाल आणि राष्ट्रपती हे कार्यकारी असून त्यांना वैधानिक प्रक्रियेत हस्तक्षेप करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे, असा मुद्दा राज्य सरकारने घटनापीठासमोर उपस्थित केला.

विधानसभांनी मंजूर केलेल्या विधेयकांना मंजुरी देण्यासाठी राज्यपाल आणि राष्ट्रपतींसाठी कालमर्यादा असावी का आणि त्याबाबतची कार्यपद्धती याबाबत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी विचारलेल्या १४ प्रश्नांसंबंधी बुधवारीही घटनापीठासमोर सुनावणी झाली. सरन्यायाधीशांसह न्या. सूर्य कांत, न्या. विक्रम नाथ, न्या. पी. एस. नरसिंह आणि न्या. अतुल शरदचंद्र चांदुरकर यांचा या घटनापीठामध्ये समावेश आहे.

"सभागृहांनी मंजूर केलेली विधेयके न्यायपालिकेच्या कार्यकक्षेत येतात. मात्र, राज्यपाल सार्वभौम जनतेच्या इच्छेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करू शकत नाहीत, तसेच ते विधेयकांच्या वैधानिक गुणवत्तेची तपासणीही करू शकत नाहीत," असे पश्चिम बंगाल सरकारची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील कपिल सिबल यांनी घटनापीठाला सांगितले. त्यापूर्वी विधानसभांनी मंजूर केलेल्या विधेयकांच्या वैधतेची न्यायालयामार्फत तपासणी केली जाऊ शकत नाही, असे तुम्हाला म्हणायचे आहे का असा प्रश्न न्यायालयाने विचारला होता.

मंजूर विधेयकांवर राज्यपालांना तातडीने निर्णय घ्यावा लागेल, तीन किंवा सहा महिन्यांच्या कालावधीत नव्हे, अशी भूमिका सिबल यांनी मांडली. स्वातंत्र्यानंतर राष्ट्रपतींनी विधेयक अडवून धरल्याचे क्वचितच एखादे उदाहरण असेल असे ते म्हणाले.

## पर्वतांच्या कुशीत सुरू होणार 'मना'चे श्लोक'चा प्रवास




**सिनेरंग**

आयुष्य हा एक प्रवास आहे, कधी सोपा, कधी कठीण, तर कधी भावनांनी भरलेला. या प्रवासाला पर्वतांची साथ आणि मनाच्या नात्यांची ऊब मिळाली तर तो प्रवास खास ठरतो. अशीच एक वेगळी गोष्ट 'मना'चे श्लोक' या चित्रपटातून प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे.या चित्रपटात मनवा आणि श्लोक यांचा प्रवास दाखवला असून, त्यात त्यांची नाती, विचार आणि स्वप्नं यांचा सुंदर संगम दिसणार आहे. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या मोशन पोस्टरमध्ये ते दोघे पर्वतांच्या दिशेने चालत निघाल्याचं दिसत असून, त्यांचे पाठमोरे रूप या प्रवासाच्या कहाणीची उत्सुकता वाढवतं. या प्रवासात त्यांचं प्रेम फुलणार का, त्यांच्या सोबत आणखी कोण असेल, ते काय मागे सोडून आले आहेत आणि डोंगर त्यांना कोणत्या नव्या दिशेने नेत आहेत, हे जाणून घेणं प्रेक्षकांसाठी नक्कीच रंजक ठरणार आहे.

या चित्रपटात मृण्मयी देशपांडे, राहुल पेठे, पुष्कराज चिरपुटकर, सुव्रत जोशी, सिद्धार्थ मेनन, हरीश दुधाडे आणि करण परब यांची भूमिका आहे.'मना'चे श्लोक' हा चित्रपट १० ऑक्टोबरला प्रदर्शित होणार असून, याचे लेखन व दिग्दर्शन मृण्मयी देशपांडे यांनी केले आहे. चित्रपटाचे निर्माते श्रेयश जाधव आणि संजय दावरा असून, हा चित्रपट स्टारलाईट बॉक्स थिएटर्स व नितीन वैद्य प्रॉडक्शन्स यांनी सादर केला आहे.

## सनडान्स फिल्म फेस्टिव्हल पुरस्कार प्राप्त 'साबर बोंडं' चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित

**लोकरंजन**

जगविख्यात सनडान्स फिल्म फेस्टिव्हल २०२५मध्ये झळकलेल्या 'साबर बोंडं' (केक्चस पिअर्स) या चित्रपटाचे मुंबईत पार पडलेल्या विशेष पत्रकार परिषदेत ट्रेलर अनावरण करण्यात आले. दिग्दर्शक रोहन परशुराम कानवडे लिखित हा चित्रपट येत्या १९ सप्टेंबर २०२५ रोजी संपूर्ण देशभरात प्रदर्शित केला जाईल. प्रसिद्ध अभिनेता राणा दग्गुबटी यांच्या 'स्पिरिट मीडिया' यांच्यातर्फे या चित्रपटाचे वितरण केले जाईल. या अगोदर स्पिरिट मीडियाने कान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये झळकलेल्या ग्रँण्ड प्रिक्स विजेता 'ऑल वी इमॅजिन अज लाईट' हा चित्रपट भारतात प्रदर्शित केला आहे.

सनडान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये जगभरातून तब्बल १७ हजार चित्रपटांचे पुरस्कारांकरिता अर्ज आले होते. 'साबर बोंडं' हा सनडान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये प्रवेश करणारा पहिला भारतीय चित्रपट ठरला. सनडान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये हा चित्रपट प्रदर्शितही झाला. या चित्रपट महोत्सवात प्रदर्शित झालेला हा पहिला मराठी चित्रपट ठरल्याने नवा इतिहास रचला गेला. 'साबर बोंडं' हा चित्रपट आनंद नावाच्या शहरी तरुणाच्या आयुष्यभोवती फिरतो. आनंद आपल्या वैयक्तिक आयुष्यात दुःखी आहे. कौटुंबिक दडपणात




जगणा-या आनंदला एकदा आपल्या मूळ गावी जावे लागते. अंत्यसंस्कारा नंतरच्या दहा दिवसांच्या विधीसाठी आनंद आपल्या गावी परततो. पश्चिम महाराष्ट्राच्या निसर्गरम्य वातावरणात वसलेल्या गावात आनंदला त्याचा बालपणीचा मित्र बाल्या भेटतो. बाल्याच्या संपर्कात आल्यावर आनंदला त्याच्या दुःखावर फुंकर घातली जाते. त्याला आपुलकी मिळते. बाल्या आनंदचे सांत्वन करतो. 'साबर बोंडं' या चित्रपटात अभिनेता भूषण मनोज, सूरज सुमन आणि जयश्री जगताप यांचा सशक्त अभिनय पाहायला मिळतो. प्रेम आणि मैत्रीच्या नाजूक बंधांचा या चित्रपटात हळूवारपणे वेध घेतला गेला आहे. 'साबर बोंडं' या चित्रटासाठी प्रसिद्ध चित्रपट निर्माते नागराज मंजुळे, निखिल अडवाणी, सई ताम्हणकर आणि विक्रमादित्य मोटवानी यांनी कार्यकारी निर्मात्याची जबाबदारी सांभाळली आहे.

## झी टीव्हीच्या चिंकी-मिंकीने "छोरियां चली गाव" मध्ये प्रेक्षकांची मन जिंकली

झी टीव्हीचा रिॲलिटी शो "छोरियां चली गाव" हा धैर्याची अंतिम परीक्षा बनला आहे, ज्यामध्ये अकरा शहरी महिला सेलिब्रिटींनी त्यांचे ग्लॅमरस शहरी जीवन ग्रामीण भारतातील ग्रामीण वास्तवासाठी बदलले आहे. सर्वात जास्त चर्चेत असलेल्या सहभागींमध्ये समृद्धी मेहरा आणि सुरभी मेहरा आहेत ज्यांना चिंकी-मिंकी म्हणून ओळखले जाते.

गायींचे दूध काढण्यापासून ते चुलीवर स्वयंपाक करण्यापर्यंत, पाणी आणण्यापासून ते गावातील असंख्य कामे पूर्ण करण्यापर्यंत, जुळे मॉडेल स्पर्धक असल्याचे सिद्ध होत आहेत. त्यांच्या शिस्त, टीमवर्क आणि आनंदी भावनेने त्यांच्या सह-स्पर्धकांना केवळ प्रभावित केले नाही तर प्रेक्षकांची प्रशंसा देखील मिळवली आहे.

पण त्यांच्या परिश्रमामागे एक खोल भावनिक कथा आहे. तिच्या मुलींना




प्रत्येक काम इतक्या प्रामाणिकपणे करताना पाहून त्यांच्या आईला अनेकदा भारावून जाते आणि अश्रू अनावर होतात. तिच्यासाठी, चिंकी-मिंकी "परिपूर्ण विद्यार्थी" आहेत जे नेहमीच त्यांचे १००% योगदान देतात, नेहमी एकमेकांच्या पाठीशी उभे राहतात. तरीही, तिच्यासाठी हा प्रवास सोपा नाही. जेव्हा जेव्हा कोणी जुळ्या मुलांवर दुखावणारी टिप्पणी करते तेव्हा ती तिच्या हृदयाला भिडते. तरीही, ती एक धाडसी चेहरा धारण करते, तिच्या मुलींना स्वतःहून चमकू देते आणि संघर्ष करू देते, तर शांतपणे वेदना सहन करते.

**टेलीरंग**

## पारू आदित्यसाठी किर्लोस्कर कुटुंब आलं एकत्र!

प्रत्येक आठवड्याला नवीन ट्विस्ट्स घेऊन येणारी *"पारू" मालिका सध्या एका हृदयस्पर्शी वळणावर आहे. पारू अनेक अडचणी, विरोध, आणि नात्यांच्या चाचण्यांमधून मार्ग काढत इथवर आली आहे. पण आता तिच्या या संघर्षाला अखेर गोड फळं मिळू लागली आहेत. कधी सावध पावलांनी, तर कधी हिम्मत दाखवत प्रत्येक अडथळ्याचा सामना करणारी पारू, आता तिच्या नात्यांना घरात जागा मिळताना दिसत आहे. आदित्यसोबतचं तिचं गुपित उलगडलं असतानाही, कुटुंबाची साथ, वडिलांचं स्वीकार, आणि आदित्यच्या प्रेमातली दृढता या सगळ्यामुळे तिच्या जीवनात आता आनंदाची पहाट उमटू लागली आहे. आदित्य आणि पारूच्या नात्याचा खुलासा झाला असून, त्यांच्या गुप्त विवाहाची बातमी अखेर किर्लोस्कर कुटुंबासमोर उघड झाली आहे. अहिल्या आदित्यच्या भविष्यासाठी काळजी करत असताना त्याला योग्य निर्णय घेण्याची सतत आठवण करून देते. दुसरीकडे, आदित्य आणि पारू गुपचूप संसाराचा आनंद घेत असताना, त्यांचे हळवे क्षण, आणि एकमेकांतली आपुलकी प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. जेव्हा श्रीकांत पारूला चूड्या भेट देतो आणि तिला "सून" म्हणून संबोधतो. त्याचा हा निःशब्द स्वीकार ही एक सशक्त भावना ठरते. मात्र हे पाहून दिशा गोंधळ घालणार आहे. यावेळी किर्लोस्कर कुटुंब एकत्र येत कबूल करतात की त्यांना आधीपासूनच आदित्य पारूचं गुपित माहित होतं! या धक्क्याने दिशा गप्प होते. या बदललेल्या वागणुकीमुळे दिशा मानसिकदृष्ट्या अडचणीत सापडणार आहे. तेव्हा बघायला विसरू नका पारू दररोज संध्या ७:०० वा. फक्त झीमराठी वर

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# अमित मिश्राची सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून निवृत्ती

नवी दिल्ली, दि. ४ वृत्तसंस्था

भारतीय क्रिकेटपटू अमित मिश्रा याने सर्व प्रकारच्या क्रिकेट फॉरमॅटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. सोशल मीडियावर पोस्ट करत अमित मिश्राने निवृत्तीची घोषणा केली. अमित मिश्राने भारतासाठी २२ कसोटी, ३६ एकदिवसीय आणि १० टी-२० सामने खेळले आहेत. अमित मिश्राने कसोटीत ७६, एकदिवसीय सामन्यात ६४ आणि टी-२० मध्ये १६ विकेट्स घेतल्या आहेत.

आज, २५ वर्षांनंतर, मी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर करतो, हा खेळ माझे पहिले प्रेम, माझे शिक्षक आणि माझ्या आनंदाचा सर्वात मोठा स्रोत आहे. हा प्रवास असंख्य भावनांनी भरलेला आहे. मी बीसीसीआय, हरियाणा क्रिकेट असोसिएशन, माझे प्रशिक्षक, सहाय्यक कर्मचारी, सहकारी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे चाहत्यांचा मनापासून आभारी आहे, ज्यांच्या विश्वासाने आणि पाठिंब्याने मला प्रत्येक पावलावर बळ दिले. सुरुवातीच्या दिवसांच्या संघर्ष आणि त्यागांपासून ते मैदानावरील अविस्मरणीय क्षणांपर्यंत, प्रत्येक अध्याय हा एक अनुभव आहे ज्याने मला एक क्रिकेटपटू आणि एक माणूस म्हणून घडवले आहे. चढ-उतारांमध्ये माझ्यासोबत खंबीरपणे उभे राहिल्याबद्दल माझ्या कुटुंबाचे आभार. हा प्रवास इतका खास बनवल्याबद्दल माझ्या सहकाऱ्यांचे आणि मार्गदर्शकांचे आभार. हा अध्याय संपवताना, माझे हृदय कृतज्ञता आणि प्रेमाने भरले आहे. क्रिकेटने मला सर्व काही दिले आहे आणि आता मी या



खेळाला काहीतरी परत देण्यास उत्सुक आहे, असं अमित मिश्रा म्हणाला.

अमित मिश्राने २००३ मध्ये बांगलादेशमध्ये झालेल्या एकदिवसीय मालिकेतून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. २००८ मध्ये मोहाली येथे ऑस्ट्रेलियाविरुद्ध अमित मिश्राने कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केले. या सामन्यात त्याने ५ विकेट्स घेतल्या. २०१३ मध्ये अमित मिश्राने झिम्बाब्वेविरुद्धच्या ५ सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत १८ विकेट्स घेत जवागल श्रीनाथच्या विश्वविक्रमाशी बरोबरी केली. २०१४ मध्ये बांगलादेशमध्ये झालेल्या टी-२० विश्वचषकातही अमित मिश्राने भाग घेतला. या विश्वचषकांत अमित मिश्राने १० विकेट्स घेतल्या. २०१७ मध्ये शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना खेळल्यानंतर, अमित मिश्राने देशांतर्गत क्रिकेट आणि आयपीएल खेळणे सुरू ठेवले. अमित मिश्राने आयपीएल २०२४ मध्ये लखनौ सुपर जायंट्सकडून राजस्थान रॉयल्सविरुद्ध शेवटचा सामना खेळला होता.

महासागर PALGHAR RNI No.: MAHAMAR/2014/62313
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 208/B, Lokmanya Building, Near Taluka Panchayat Samiti Office, Palghar(W)-401404, **Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK,** Executive Editor (Palghar)- Shashi Karpe

महासागर पालघर
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा जवळ, वैशाली नगर लास्ट बस स्टॉप, दहिसर ईस्ट, मुंबई- ४०००६८ येथे छापून २०८/बी, लोकमान्य बिल्डिंग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर पालघर (प.) ४०१४०४ येथे प्रसिद्ध केले. संपादक : **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (मो. ९९२२९७००२३) कार्यकारी संपादक (पालघर) - शशी करपे (मो.नं. ९८९२९६८७२५) Email : mumbaimahasagar@gmail.com** RNI No.: MAHAMAR/2014/62313